21 Nov 2026_Layout 1 11/20/2026 10:29 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर/November
शनिवार/Saturday
दि.२१/Dt: 21
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com मुख्य संपादक : बालासाहेब कडबाने 9423912525 निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061 www.jagmitra.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३०/Issue 30 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

विरोधात काम करणाऱ्याची बाजू घेतो का?

सुरेश धसांच्या दमदाटीची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल

बीड/प्रतिनिधी

भाजपचे आमदार सुरेश धस यांची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या क्लिप मध्ये त्यांनी एका तरुणाला दम दिल्याचा आरोप करण्यात येतोय. माझ्या विरोधात काम करणाऱ्यांची बाजू घेतो का असं म्हणत सुरेश धसांनी फोनवरून दम दिल्याचा दावा करण्यात आला आहे. तू समजतो काय स्वतःला, तू माझ्या विरोधातल्या माणसाला पुळका येतो, त्याचे हात पाय मोडल्या नंतर तुझा नंबर लागू नये. तसं काय नाही म्हणजे तू फोन कस काय लावला बाळासाहेबांना, पाटलांच काम कर तू, सोशल मीडियाच त्याच्याबद्दल म्हणणं नाही, मनोज चौधरीचा कोणी पुळका आणायला सांगितला तुला अशा शब्दात आमदार सुरेश धस यांनी तरूणाला दम दिल्याचं बोललं जात आहे, एबीपी माझा या ऑडीओ क्लीपची पुष्टी करत नाही.

माझ्या विरोधात काम करणाऱ्यांची बाजू घेतो का म्हणत आमदार सुरेश धस यांनी एका तरुणाला फोनवरून दम दिला आहे. सदरील तरुणाने जरांगे पाटील यांचं सोशल मीडियाचं काम पाहत असल्याचा दावा यात केला जात आहे. दरम्यान ही कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

माझी आणि आमदार सुरेश धसांची कॉल रेकॉर्डिंग AI ने बनवलेली

मनोज चौधरी विरोधात मानहानीचा गुन्हा दाखल करणार असल्याचं अशोक वांढरे यांनी म्हटलं आहे. आमदार सुरेश धस यांची एक कथित कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली होती. ज्यामध्ये आमदार सुरेश धस एका



तरुणाला दम देत असल्याचे ऐकायला येत होते. ती कॉल रेकॉर्डिंग मनोरुग्न असलेल्या मनोज चौधरी नामक व्यक्तीने अख ने बनवल्याचे तरुण अशोक वांढरे याने एका व्हिडिओ च्या माध्यमातून सांगितलं आहे. यामध्ये माझा आणि आण्णाचा संवाद असल्याचे दाखवण्याचा केवीलवाणा प्रयत्न आहे.यामुळे मनोज चौधरी याच्या विरोधात मानहानीचा गुन्हा दाखल करणार असल्याचे देखील या तरूणाने म्हटले आहे.

आज सकाळपासून व्हायरल झालेली ऑडिओ क्लिप ज्यामध्ये अण्णाचा आणि माझा संवाद एआयच्या माध्यमातून बनवून दाखवण्याचा जो केविलवाणा प्रयत्न मनोरुग्ण असलेला मनोज चौधरीने केलेला आहे. माझे आणि सुरेश अण्णा धस यांचे संबंध अनेक वर्षांपासून खूप चांगले आहेत. आत्ता २ महिन्यापूर्वी मला दवाखान्यामध्ये ऑपरेशन करण्यासाठी अण्णाने खूप मोठी आर्थिक मदत केलेली आहे. मी अण्णाचे उपकार आयुष्यभर विसरणार नाही.

मनोरुग्ण असलेल्या मनोज चौधरीने सुरुवातीपासून आमच्या पांढरी गावची आणि पांढरी गावातील नागरिकांची बदनामी करण्याचं काम केलेलं आहे. शिवाय लोकनेते असलेले सुरेश अण्णा धस हे नेहमी जनतेसाठी २४ तास जनतेसाठी कामासाठी उपलब्ध असतात, अडीअडचणी सोडवण्यासाठी मदत करतात. सुरेश अण्णा धस यांची ही जी एआय मार्फत ॲडिओ बनवून मनोज चौधरीने जी बदनामी केलेली आहे हा त्याचाच एक भाग आहे. मी लवकरच मनोज चौधरीवर एक मानहानीचा गुन्हा दाखल करणार असल्याचंही तरूणाने म्हटलंय.

नगरसेवक बिभीषण गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

इंधन बोरमधून पाणीपुरवठा सुरू



धारूर/अतुल शिनगारे

धारूर शहरातील गायकवाड गल्ली परिसरातील नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन नगरसेवक बिभीषण गायकवाड यांच्या विशेष सहकार्याने काही महिन्यांपूर्वी इंधन बोर घेण्यात आला होता. मात्र, या बोरमध्ये मोटार बसविण्यात आली नसल्याने त्याचा पाणीपुरवठ्यासाठी उपयोग होत नव्हता. सध्या शहरात दुष्काळी परिस्थिती (पान २ वर)

परळी वैजनाथ नगर परिषदेचा दिल्लीत राष्ट्रीय गौरव

केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांच्या हस्ते पीएम स्वनिधी सन्मान पुरस्कार प्रदान

प्रामाणिक कामासाठी प्रेरणा; हा गौरव तमाम परळीकरांचा–नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगर परिषदेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पथविक्रेत्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल परळी वैजनाथ नगर परिषदेला प्रतिष्ठेचा मस्वनिधी सन्मान पुरस्कार २०२६फ केंद्रीय मंत्री मनोहर



लाल खट्टर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नवी दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित या सोहळ्यास केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल खट्टर, राज्यमंत्री तोखन साहू, सचिव सतेंद्र सिंग, सहसचिव तथा व्यवस्थापकीय संचालक श्रीमती ईशा कालिया यांच्यासह देशभरातील बँक (पान २ वर)

सूर्यकांत बडे यांची कर्जाच्या कंटाळून आत्महत्या



सिरसाळा/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील खामगाव येथील सूर्यकांत बाजीराव बडे (वय ५२ वर्षे) यांनी कर्जाच्या कंटाळून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे खामगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून बडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

सूर्यकांत बाजीराव बडे यांच्या पश्चात पत्नी सीमा सूर्यकांत बडे, मुलगा अजय सूर्यकांत बडे, मुली कोमल सूर्यकांत बडे आणि पूजा सूर्यकांत बडे असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे.

कर्जाच्या ओझ्यामुळे एका कुटुंबाचा आधार हरपल्याने या घटनेने ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणाचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आर्थिक अडचणींमुळे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ कोणावरही येऊ नये, यासाठी समाजाने आणि प्रशासनाने अशा संकटात सापडलेल्या कुटुंबांना वेळीच आधार देण्याची गरज आहे.

ए.के.शिवहरे कंपनीच्या मनमानी विरोधात तेलगावकर रस्त्यावर!

संतप्त नागरिक व व्यापाऱ्यांनी अडवली कंपनीची वाहने; छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी

धारूर/अतूल शिनगारे

तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रखडलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामामुळे नागरिक, व्यापारी आणि वाहनधारकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. धुळीचा त्रास, विस्कळीत वाहतूक आणि अपघातांचा धोका वाढल्याने अखेर नागरिकांचा संयम सुटला. शुक्रवारी सकाळी संतप्त नागरिक व व्यापाऱ्यांनी ए.के. शिवहरे कंपनीची वाहने अडवून काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

जरूड ते सिरसाळा दरम्यान सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामांतर्गत तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील काम अनेक दिवसांपासून अपूर्ण आहे. हा चौक वर्दळीचा असल्याने दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, अर्धवट कामामुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला असून वाहनधारकांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रस्त्याच्या कामामुळे उडणाऱ्या धुळीचा परिसरातील दुकानदार, व्यापारी आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुकानांमध्ये धूळ साचत असल्याने व्यावसायिकांचे नुकसान होत आहे. याबाबत संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही कामाला गती (पान २ वर)


चकलांबात पिण्याच्या पाण्याची टंचाई, मात्र सिमेंट रस्त्यासाठी हजारो लिटर पाण्याचा वापर!

नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी भटकंती; बाजारपेठेतील रस्त्याचे काम सुरूच! जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन होतेय का? ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

चकलांबा/प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा गावात एकीकडे भीषण पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असताना दुसरीकडे गावातील बाजारपेठेत सिमेंट रस्त्याचे मोठे काम सुरू असल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गावातील महिलांना हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नसताना सिमेंट रस्त्याच्या कामासाठी दररोज हजारो लिटर पाण्याचा वापर होत असल्याचा आरोप ग्रामस्थ व व्यापाऱ्यांकडून केला जात आहे.

सध्या दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आणि आवश्यक त्या कामांबाबत निर्बंध पाळण्याचे जिल्हा प्रशासनाचे आदेश असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, चकलांबा बाजारपेठेत सिमेंट



रस्त्याचे काम सुरूच असल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी नेमकी कशी होत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

एकीकडे नागरिक तहानलेले, दुसरीकडे रस्त्यावर पाण्याचा वापर!

गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना रस्त्याच्या कामासाठी वापरले जाणारे पाणी नेमके कुठून आणले जाते? या कामासाठी कोणाची परवानगी घेण्यात आली आहे? दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा वापर करण्यासंदर्भात प्रशासनाची (पान २ वर)

यशवंत उद्यानासाठी घोषित १ कोटी ३५ लाखांव्यतिरिक्त वाढीव निधी द्या!

पेठ विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आ.विजयसिंह पंडित यांच्याकडे वाढीव निधीसह पाच महत्त्वपूर्ण मागण्या–अमर नाईकवाडे

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील पेठ विभागाच्या अस्मितेचा आणि नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या यशवंत उद्यानाच्या विकासासाठी आमदार विजयसिंह पंडित यांनी यापूर्वी घोषित केलेल्या १ कोटी ३५ लाख रुपयांच्या निधीव्यतिरिक्त आणखी वाढीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड शहराध्यक्ष तथा नगरसेवक अमर मारुतीराव नाईकवाडे यांनी आमदार विजयसिंह पंडित यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे.

यशवंत उद्यानाचा सर्वांगीण विकास करून पेठ विभागातील नागरिकांसाठी एक सुंदर, आकर्षक आणि सर्व सुविधांनी युक्त असे विरंगुळ्याचे ठिकाण निर्माण व्हावे, यासाठी उद्यानाचे सुशोभीकरण, आकर्षक प्रवेशद्वार, वॉकिंग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळण्याची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, विद्युत रोषणाई आणि हिरवळीची निर्मिती यांसारखी कामे दर्जेदार पद्धतीने करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. एमआयडीसी ते श्रीक्षेत्र खंडेश्वरी माता मंदिर (खिंड रस्ता) या रस्त्याच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित यांनी यशवंत उद्यानाच्या विकासासाठी १ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. या उद्यानाच्या विकासासाठी अमर नाईकवाडे यांनी त्यावेळी आग्रही भूमिका मांडली होती. आता या उद्यानाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी घोषित निधीव्यतिरिक्त वाढीव निधी मिळावा, अशी मागणी त्यांनी



केली आहे. याशिवाय पेठ विभागातील इतर चार महत्त्वपूर्ण नागरी प्रश्नही निवेदनाद्वारे मांडण्यात आले आहेत. सुभाष रोड ते मोंढा रोड या बिंदुसरा नदीकाठच्या रस्त्याचा दर्जेदार विकास करावा. जैन भवन व श्री संत सावता महाराज मंदिरासमोरील या रस्त्याचा विकास झाल्यास वाहतुकीस पर्यायी मार्ग उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच रविवारच्या भाजीबाजारातील विक्रेत्यांसाठी पर्यायी जागेची व्यवस्था करण्यासही याचा उपयोग होऊ शकतो.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते माळीवेस या मार्गावर दर रविवारी भरणाऱ्या भाजीबाजारामुळे होणारी वाहतूक कोंडी कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पर्यायी बाजारपेठ, विक्रेत्यांचे नियोजन आणि प्रभावी वाहतूक व्यवस्थापन करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

हिरालाल चौक येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उंची वाढवून परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच हनुमान नगर भागातील विश्व दत्त लॉन्स ते पिंपळनेर रोडपर्यंत आवश्यक त्या ठिकाणी नाली बांधकाम करून रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण अथवा काँक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. पेठ विभाग हा बीड शहराच्या ऐतिहासिक, व्यापारी आणि सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वपूर्ण भाग आहे. या विभागातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा मिळाव्यात, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागावेत आणि परिसराचा नियोजनबद्ध विकास व्हावा, यासाठी या सर्व कामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ विभागातील या विकासकामांसाठी भरीव निधी उपलब्ध होईल आणि संबंधित कामांना प्रत्यक्ष सुरुवात होईल, असा विश्वास अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केला. पेठ विभागाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असून, नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



21 Nov 2026 page 2_Layout 1 11/20/2026 10:56 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक
जगमित्र
विशेष संपादकीय

थांब लक्ष्मी....

टाटा समूहाच्या वादात कळीच्या नारदाची भूमिका बजावणारे वेणू श्रीनिवासन यांचेच कुटुंब कलहाने ग्रासले जाणे यास काव्यागत न्याय म्हणणे अशोभनीय ठरेल. त्यामुळे तसे न करण्याची खबरदारी घेऊन दक्षिणेतील मटीव्हीएसफ समूहाच्या प्रवर्तक कुटुंबीयांत जे सुरू आहे त्यावर भाष्य करायला हवे. या वेणू श्रीनिवासन यांनी रतन टाटा यांच्या निधनानंतर सक्रिय झालेल्या नोएल टाटा यांच्याविरोधात बंडाचे निशाण उभारले. याच वेणू श्रीनिवासन यांनी महाराष्ट्र सरकारच्या धर्मादाय आयुक्तांकडे टाटा न्यासाविरोधात तक्रार दाखल केली आणि अत्यंत कर्तव्यपरायण महाराष्ट्र सरकारने न्यास संचालक मंडळ बैठकीस स्थगिती दिली. याच वेणू श्रीनिवासन ज्यांनी राजकारण्याप्रमाणे वागणाऱ्या मटाटा सन्सफच्या एन. चंद्रशेखरन्यांना पदत्यागाचा निर्णय मागे घेऊन पुन्हा गुडघ्यास बाशिंग बांधून उभे राहण्यास पाठिंबा दिला. आता याच वेणू श्रीनिवासन यांच्याविरोधात त्यांच्या कन्येनेच बंड पुकारले असून तिने आपल्या तीर्थरूपांवर पुरुषसत्ताक मानसिकतेचा आरोप केला आहे. आणि विशेष हे की याच वेणू श्रीनिवासन यांच्या पत्नीने- मल्लिका श्रीनिवासन यांनी- मुलीची बाजू उचलून धरली असून मुला-मुलींमध्ये भेद करणाऱ्या स्वत:च्या पतीविरोधात जाहीर भूमिका घेतली आहे. मटीव्हीएसफ समूह दक्षिणेतील आणि त्याचे प्रवर्तक मटॅमब्रॅमफ अशा लोकप्रिय लघुनामाने ओळखले जाणारे तमिळ ब्राह्मण. ही मंडळी स्वत:स अप्रत्यक्षपणे का असेना; पण उच्च दर्जाचे मानत इतरांस कमी लेखतात. अशा जातिवंत मदेसीफ कुटुंबातील महिलेने आपल्या धर्म-पतीविरोधात अशी, इतकी जाहीर भूमिका घेणे तसे विरळाच. त्यामुळे हा वाद लक्षणीय ठरतो. त्याच्या मुळाशी आहे २०२४ साली या कुटुंबाच्या चार सदस्यांत झालेला मसामंजस्यफ (?) करार. त्यानुसार वेणू श्रीनिवासन यांची मालकी असलेल्या संपत्तीचे वाटप करण्याचे ठरले. टीव्हीएस समूहातील विविध कंपन्यादींची विभागणी त्यानुसार होणार होती. त्याआधी चार वर्षांपासून, म्हणजे २०२० पासून या चौघांत वाटणीच्या अनुषंगाने चर्चा सुरू होती.

तोतया तपासणी अधिकारी श्रीकांत डोईफोडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

धाराशिव/प्रतिनिधी

मंत्रालयीन स्तरावरील शिक्षण विभागाचा अधिकारी असल्याचे भासवून वसतिगृह तप-ासणीसाठी आल्याचे सांगत शासकीय यंत्रणेची दिशाभूल करणाऱ्या श्रीकांत डोईफोडे या व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २०४ व २०५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संबंधित व्यक्तीने आपण मंत्रालयीन स्तरा-वरील शिक्षण विभागातील अधिकारी असल्याचे भासवून वसतिगृह तपासणीच्या निमित्ताने प्रशासकीय यंत्रणेवर प्रभाव निर्माण केला. तसेच निवासासाठी तुळजापूर येथील शासकीय विश्रामगृहाची व्यवस्था करणे, तुळजाभवानी



देवीच्या दर्शनाची सोय करणे आणि अन्य प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधितांना भाग पाडल्याची बाब समोर आली.

मात्र, संबंधित व्यक्तीच्या ओळखीबाबत संशय निर्माण झाल्यानंतर पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये तो मंत्रालयीन स्तरावरील अधिकारी नसल्याची खात्री झाल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा म्हाडदळकर तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दिनकर अंबादास होळकर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांच्यामार्फत संबंधित व्यक्तीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांनी कुक्कुट पालन करावे-डॉ.सोळुंके



अणदूर/सचिन तोग्गी

सध्या मराठवाडा भीषण दुष्काळाच्या स्थितीत असून शेतकऱ्यांनी आजिबात घाबरून न जाता पर्यायी शेतीपूरक व्यवसाय करावेत जेणेकरून या दुष्काळाशी दोन हात करता येतील, त्या मध्ये सगळ्यात चांगला उपाय म्हणजे कुक्कुट पालन हा आहे,असे उदगार प्रसिद्ध वीरबॅक कंपनी चे पोल्ट्री मार्गदर्शक डॉ. गजानन सोळुंके यांनी केले आहे. ते जळकोट येथे अमृत मेडिकल स्टोअर्स व वीरबॅक कंपनी आयोजित कोंबडी पालन मार्गदर्शन शिबिरात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते,कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळकोट पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुख डॉ.मयुर शिसोदिया तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मल्लिनाथ बिराजदार, जीवन मोजगे, संजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

खरीप २०२० प्रकरणी रु.२२६ कोटींचा दिलासा; दीर्घ न्यायालयीन लढ्याला यश-राणाजगजितसिंह पाटील

खरीप २०२० मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाच्या पीकविम्यापोटी धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना मिळणाऱ्या सुमारे २२६ कोटी रुपयांच्या भरपाईचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. बाधित शेतकरी बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने केलेल्या निवोजनबद्ध पाठपुराव्याला आणि दीर्घ न्यायालयीन लढ्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. जिल्ह्यातील हजारो शेतकरी बांधवांसाठी हा मोठा दिलासा असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. काढणीनंतर शेतात ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजी पावसात भिजल्याने दाण्यांना मोड आले, तर अनेक ठिकाणी सोयाबीन



सडून गेले. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले होते. या संकटाच्या काळात पीकविमा कंपनीकडून नुकसानभरपाई मिळणे अपेक्षित असताना, नुकसानीची माहिती ७२ तासांच्या आत दिली नसल्याचे तांत्रिक कारण पुढे करून अनेक शेतकऱ्यांचे विमा दावे नाकारण्यात आले होते.विमा कंपनीच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या भरपाईपासून वंचित राहावे लागले.तत्कालीन ठाकरे सरकारकडे याबाबत आमदार पाटील यांनी पाठपुरावा केला,सरकारने विमा कंपनी सोबत बैठक घ्यावी व शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागावा अशी मागणी केली परंतु सरकारने याकडे दुर्लक्ष केले.मात्र तरीही, हा अन्याय दूर करण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेत हा विषय न्यायालयात नेण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने शेतकऱ्यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. या निर्णयाला विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयातही कंपनीला दिलासा मिळाला नाही.

या प्रकरणात मुख्यमंत्री,दोन्ही उपमुख्यमंत्री व कृषी मंत्री तसेच शेतकरी बांधवांच्या वतीने बाजू मांडणारे ॲड. सुधांशु चौधरी तर राज्य शासनाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडणारे सिनियर काउन्सिल ॲड. बलबिर सिंग व ॲड.रमेश धोर्डे पाटील,ॲड.राजदीप राऊत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील श्री. सुमित सोनटक्के तसेच जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाधिकारी व या काळात कार्यरत असलेले पूर्व जिल्हाधिकारी, कृषी आयुक्त,जिल्हा कृषी अधीक्षक ,तत्र अधिकारी सहाय्यक कृषी अधिकारीयांचे मोलाचे योगदान लाभले असून शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे आभारी असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

पान १ वरून....

बिभीषण गायकवाड

निर्माण झाली असून पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगरसेवक बिभीषण गायकवाड व फावडे यांनी नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव व नगरपालिकेकडे पाठपुरावा केला. यासंदर्भात नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत निळे यांना निवेदन देऊन इंधन बोरमध्ये मोटार बसवून पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती.या मागणीची दखल घेत २० नोव्हेंबर रोजी नगरपालिकेच्या वतीने संबंधित बोरमध्ये मोटार बसविण्यात आली. त्यामुळे गायकवाड गल्ली परिसरातील नागरिकांसाठी पाणीपुरवठा सुरू झाला आहे.पाणीटंचाईच्या काळात केलेल्या या प्रयत्नामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, नगरसेवक बिभीषण गायकवाड व नगरसेवक फावडे यांचे आभार मानले आहेत. यावेळी ॲड मोहन भोसले,नगर परिषदेचे पाणीपुरवठा प्रमुख ऋषी तांबवे सह कर्मचारी तसेच या भागातील महिला ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

.....

पीएम स्वनिधी सन्मान

प्रतिनिधी, विविध राज्य शासनांचे प्रतिनिधी, पुरस्कारप्राप्त महापौर व नगराध्यक्ष तसेच पथविक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. देशभरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नागरी उपजीविका अभियान कक्षप्रमुख मीना नेहरकर, सतीश खेबाळे यांच्यासह सहकारी कर्मचाऱ्यांनी हा सन्मान स्वीकारला.

.....

ए.के.शिवहरे कंपनी

मिळत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.अखेर शुक्रवारी नागरिक व व्यापाऱ्यांनी एकत्र येत कंपनीची वाहने अडवून निषेध व्यक्त केला. रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, नियमित पाणीफवारणी करावी आणि वाहतुकीसाठी सुरक्षित पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

अपघात झाल्यास जबाबदार कोण?

रस्त्याचे काम सुरू असताना नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे. मात्र, चौकातील अपूर्ण काम आणि सुरक्षिततेचा अभाव पाहता एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. आता तरी कंपनी प्रशासनाने दखल घेऊन काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी तेलगावकरांकडून होत आहे.

.....

चकलांबा

भूमिका काय आहे? असे अनेक प्रश्न ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांकडून उप-स्थित केले जात आहेत. या कामाचे अँगल कॅमेऱ्यातील फोटो तसेच इतर पुरावे उपलब्ध असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी होत आहे.

ग्रामविकास अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का?

जिल्हा प्रशासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचे पालन करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असताना चकलांबा ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या या कामाबाबत ग्रामविकास अधिकाऱ्यांची भूमिका काय, असा प्रश्न उप-स्थित होत आहे. पाणीटंचाईच्या काळात नियमांचे उल्लंघन झाले असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. आता जिल्हाधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन चौकशीचे आदेश देणार का? तसेच नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणार का? याकडे चकलांबावासीयांचे लक्ष लागले आहे.

शेवटच्या पानावरून...

सखोल मार्गदर्शन

शेतकरी व ग्रामस्थांनी मोठी गर्दी करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. भोसले साहेब आणि उपकृषी अधिकारी श्री. कारभारी पौळ साहेब उपस्थित होते. मान्यवरांनी दोन्ही योजनांचे निकष, अर्ज करण्याची पद्धत, अनुदानाचे स्वरूप आणि शेतीतील जलसंधारणाचे महत्त्व यावर उपस्थित शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.गटविकास अधिकारी श्री. भोसले साहेब म्हणाले कि, ''शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे पाणी जिरवून भूजल पातळी वाढवण्यासाठी जलतारा योजना अत्यंत उपयुक्त आहे, तर बदलत्या हवामानाशी जुळवून घेत शाश्वत शेती करण्यासाठी पोखरा प्रकल्प वरदान ठरत आहे. पिंप्री बु. येथील प्रत्येक पात्र शेतकऱ्याने या दोन्ही योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. प्रशासनाच्या वतीने तांत्रिक आणि कागदपत्रांची सर्व मदत शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्ध करून दिली जाईल.'' या प्रसंगी पिंपरी बु. चे सरपंच श्री. माणिकराव पौळ, ग्रामविकास अधिकारी श्री. शेळके यांच्यासह श्री. लक्ष्मण तात्या पौळ, श्री. आश्रुबा दादा काळे, श्री. सुरेश माने, श्री. बबनराव पौळ, श्री. विष्णु माने, श्री. रमेश पौळ,माजी पंचायत समिती सदस्य वसंतराव राठोड, श्री. गणेश पौळ, श्री. आबासाहेब काळे तसेच मोठ्या संख्येने शेतकरी व गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

.....

खुर्शीदआलम

म्हणाले की जगाने खुप प्रगती केलीय तरीपण आजपर्यंत जगात कुठेच रक्त तैयार होत नाहीय म्हणून माणसानेच माणसाला रक्त द्यावे लागते म्हणून लोकांनी विशेषकर तरुणांनी रक्तदान करावे असे नम्र आवाहन करून वसीम भाईला शुभेच्छा दिल्या आहेत, सदर कार्यक्रमाचे आयोजक तथा राष्ट्रवादी अल्पसंख्यांकाचे बीड शहराध्यक्ष वसीम भाई यांनी सर्व मान्यवरांचे व रक्तदात्यांचे आणि शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सहकार्यांचे आभार मानले केले आहे,

.....

'माय महोत्सव'

डॉ. शशिकांत कराड, डॉ. अशोक लोढा, डॉ. सुजित मुंडे. - नेत्र तपासणी : डॉ. मुकुंद सोळंके, डॉ. मनीष तवले. - स्त्रीरोग तपासणी : डॉ. कल्पना गिते, डॉ. हर्षा बाहेकर. - अस्थिरोग तपासणी : डॉ. पांडुरंग फड. - फिजिओथेरपी : डॉ. राहुल देशमुख. - बालरोग तपासणी : डॉ. व्यंकटेश तिडके, डॉ. राजेश जाजू, डॉ. संजय गिते, डॉ. उमेश मुंडे. - पोट व मूळव्याध तपासणी : डॉ. संतोष (एस.आर.) मुंडे, डॉ. कुणाल जैन. - हृदयरोग तपासणी : डॉ. मनोज मुंडे, डॉ. वैभव दुबे. - कान, नाक, घसा तपासणी : डॉ. मंगेश गिते. - जनरल तपासणी : डॉ. अनंत मुंडे, डॉ. विश्वास बाहेकर, डॉ. तुषार पिंपळे, डॉ. महेंद्र जाजू, डॉ. बालाजी फड, डॉ. आकाश थोरवे.

मान्यवरांच्या उपस्थितीत होणार कार्यक्रम

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. मनीषा अजयजी मुंडे व मा. सौ. अर्चना नागरगोजे (कृषी अधिकारी) या उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ. जयश्रीताई पापा गिते (नगरसेविका, नगर परिषद परळी वैजनाथ) उपस्थित राहणार आहेत.

आयोजक व मार्गदर्शक

या महोत्सवाचे आयोजक श्री. डॉ. भरत जनार्धन मुंडे (एम.एस. सर्जन, विवेकानंद हॉस्पिटल, परळी वै.) असून ते विवेकानंद सामाजिक सेवा प्रतिष्ठान, टोकवाडीचे अध्यक्ष आहेत. कार्यक्रमाचे व्यवस्थापक श्री. संतोष नाथराव मुंडे (जय हिंद प्रतिष्ठान) आहेत. मार्गदर्शक म्हणून श्री. संभाजी जनार्धन मुंडे (योग प्रशिक्षक) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यवाहक : अर्जुन मुंडे, संदीपान मुंडे, नितीन मुंडे, तुकाराम मुंडे. सूत्रसंचालन : माऊली मुंडे, मिनानाथ मुंडे, बालाजी अघाव व श्रीराम मुंडे. आईच्या अमृतदिनानिमित्त आरोग्य, महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम घडवून आणणारा हा 'माय महोत्सव' टोकवाडी परिसरासाठी एक प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक, महिला, युवक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

.....

गायके राजू

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्या

१. मराठवाड्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर उसाला प्रतिटन किमान ४,२०० रुपये अंतिम दर मिळावा. २. उसाला पहिली उचल प्रतिटन ३,९०० रुपये द्यावी. हंगाम संपल्यानंतर १०० रुपये व साखरेचे दर वाढल्यानंतर आणखी २०० रुपये द्यावेत. ३. साखर कारखान्यांमधील वजन काट्यांची काटेकोर तपासणी करून वजन काटे ऑनलाइन करावेत. ४. साखरेचे दर वाढल्यास ७० टक्के वाटा शेतकऱ्यांना व ३० टक्के कारखानदारांना मिळावा. ५. साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५० रुपये व इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा. ६. साखर कारखानदारांनी तात्काळ ऊस दर जाहीर करावा. ७. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान तात्काळ द्यावे. ८. सन २०२६ चा पीक विमा १०० टक्के मंजूर करून विमा रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. ९. रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकरी व शेतमजुरांसाठी तात्काळ कामे सुरू करावीत. १०. जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्याऐवजी थेट शेतकऱ्यांच्या दावणीला चारा उपलब्ध करून द्यावा. ११. महावितरण विभागाने शेतकऱ्यांना सुरळीत वीजपु-रवठा करावा. १२. सरसकट कर्जमाफी करावी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ द्यावा. १३. सोयाबीनला प्रतिक्विंटल किमान १० हजार रुपये भाव मिळावा. १४. कापसाला प्रतिक्विंटल किमान १२ हजार रुपये भाव मिळावा.

.....

बौद्धविहार

त्यामुळे अशा महत्त्वपूर्ण वास्तूचे बांधकाम करताना समाजाच्या भावना, धार्मिक गरजा आणि सार्वजनिक उपयोगिता यांचा विचार होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, सद्यस्थितीत मंजूर करण्यात आलेल्या आराखड्यामध्ये समाजाच्या गरजांचा पुरेसा विचार झा-लेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. समाजबांधवांशी कोणतीही चर्चा अथवा विचारविनिमय न करता आराखड्याला मंजुरी देण्यात आल्याचेही निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे. बौद्धविहारामध्ये धम्म उपासना, सामाजिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजप्रबोधनासाठी प्रशस्त सभागृह असणे आवश्यक आहे. तसेच स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, योग्य प्रवेश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांचा समावेश असलेला आधुनिक व समाजोपयोगी आराखडा तयार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

.....

कौसडी

यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शहीद हजरत टिपू सुलतान यांनी भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले यो-गदान, ब्रिटिशांविरुद्ध केलेला संघर्ष आणि त्यांचे शौर्य याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शेख नईमोद्दीन कौसडीकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाकेर पटेल, मुजु शेख, फारूख शेख, नाझीम पठाण, रशीद मुल्ला, जुनेद शेख, अयान शेख यांच्यासह शेर-ए-म्हैसूर हजरत टिपू सुलतान युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

.....

डॉ.जगदीश टेकाळे

आणि व्यक्ती पूर्णपणे त्या गर्तेत अडकत जातो.ङ्घङ्घ प्रश्न : व्यसनाचा परिणाम व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर आणि कुटुंबावर कसा होतो ? याचा सर्वात पहिला फटका व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर बसतो. तो कामधंदा सोडून देतो किंवा दुर्लक्ष करतो. घरात सतत आर्थिक चणचण भासू लागते. व्यसनासाठी पैसे नसल्याने घरात वाद, मारहाण आणि कलह वाढतात. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीची विचार करण्याची क्षमता बिघडल्यामुळे त्याला आपल्या जीवनसाथीवर (बायकोवर) विनाकारण संशय बळावतो. यातून अनेकदा कौटुंबिक हिंसाचाराच्या दुर्दैवी घटना घडतात.

जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी आमच्या ऑफिसवर येवून माहिती व अधिकार दिल्यावरून सदर जाहिर प्रगटन देत आहे की आमच्या पक्षकार यांनी कसबे परळी वै. येथील नगर परिषद कक्षेतील जमीन सर्व्हे नंबर २३/१, मधील प्लॉट नंबर १६ ज्याचा सिटी सर्व्हे नंबर ४३१४ जो पुर्वपश्चिम ३० फुट, दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ८३.६४ चौरस मीटर ज्याची चतुर्सिमा पुर्वेस १५ फुट रस्ता, पश्चिमेस प्लॉट नंबर १५ दक्षिणेस : १५ फुट रुंद रस्ता उत्तरेस मोकळी जागा.

येणे प्रमाणे वरील चतुर्सिमेच्या आतील एकुण क्षेत्रफळ ८३.६४ चौरस मीटर खुल्ला प्लॉट आमचे पक्षकार यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ठराव जयश्री विष्णुपंत मुंडलीक, रा. विवेकानंद नगर, परळी वै. यांच्या सोबत केला असून रितसर ईसारपावती झालेली आहे. तरी सदरील मिळकतीबाबत कोणा-चाही हक्कसंबंध, वहिवाट, गहाण, दान, वारसाहक्क, करार तसेच बँक, पतसंस्था यांचे तारण कर्ज बोजा तसेच इतर कोणत्याही प्रकरचा वारसाहक्क संबंध अथवा उजर असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप आमच्या ऑफिसवर येवून रितसर नोंदवावा. मुद्दतीत आक्षेप, उजर आला नाही तर कोणाचाही हक्क अथवा उजर नाही असे समजून आमचे पक्षकार सदरील मिळकतीचे रितसर नोंदणीकृत खरेदीखत दस्त त्याच्या हक्कात नोंदवुन घेतील मुदतीनंतर आलेल्या आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही..

सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येते.
दिनांक : १८/११/२०२६.

जाहिर प्रगटन देणार तर्फे
ॲड.रमेश लक्ष्मण अप्पा साखरे
तात्या पद्मावती गल्ली, परळी वैजनाथ
मो.नं. ८०८७१२८०८०

जा.क्र.४६५०/२०२६-२७
कार्यालय, नगर परिषद, परळी वै.
जिल्हा बीड, दिनांक : २०/११/२०२६

जाहिरनामा

प्रकरणः मालमत्ताकर नोंदवहित अर्जदाराचे नावाची नोंद घेणे बाबत.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, श्री/श्रीमती **हमीदाबी अल्ताफ शेख व इतर** यांनी खालील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे घर क्र./प्लॉट/पैकी जागेस नंबर नांव नोंदविण्यास **वारस प्रमाणपत्रा** चे आधारे कार्यालयाकडे अर्ज केलेला आहे. घर क्र. १५१९, वार्ड क्र.३, शीट नं. चालता नं., सी.टी.एस.नं. , **सर्व्हे नं.** मोहल्ला : काकर मोहल्ला, जागेची चतुर्सिमा, जागेचे मोजमाप : १० X १२
पुर्वेस : अल्लाउद्दीन हनिफ
पश्चिमेस : फारुख बबन
दक्षिणेस : रस्ता
उत्तरेस : शेख लाला
सदरी घरास/जागा **अल्ताफ शेख मौला काकर** ची नोंद या कार्यालयातील मालमत्तकर नोंदवहित आहे. / यानी विक्री केली आहे. सदरी अर्जप्रमाणे नांव नोंदणी संबंधी कोणास काही आक्षेप हरकत किंवा सुचना करावयाची असेलतर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिद्ध तारखेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यासह लेखी अर्ज करावा नंतर आ-लेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, परळी वैजनाथ

जा.क्र.४६५१/२०२६-२७
कार्यालय, नगर परिषद, परळी वै.
जिल्हा बीड, दिनांक : २०/११/२०२६

जाहिरनामा

प्रकरणः मालमत्ताकर नोंदवहित अर्जदाराचे नावाची नोंद घेणे बाबत.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, श्री/श्रीमती **शेख युनुस शेख कासिम व इतर** यांनी खालील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे घर क्र./प्लॉट/पैकी जागेस नंबर नांव नोंदविण्यास **खरेदीखत/कोर्टवारस** चे आधारे कार्यालयाकडे अर्ज केलेला आहे. घर क्र. १३८५/३४१, वार्ड क्र.६/३, शीट नं. चालता नं., सी.टी.एस.नं. , **सर्व्हे नं.** मोहल्ला : इस्लामपुरा, जागेची चतुर्सिमा, जागेचे मोजमाप : १० X ३०
पुर्वेस : अन्वर हुसन शेख यांचे घर १०X३०
पश्चिमेस : आसेफ खॉ राती शेख यांचे घर
दक्षिणेस : आसेफ खॉ राती शेख यांचे घर
उत्तरेस : रस्ता
सदरी घरास/जागा **शेख निजाम शेख मंजुर व इतर** ची नोंद या कार्यालयातील मालमत्तकर नोंदवहित आहे. / यानी विक्री केली आहे. सदरी अर्जप्रमाणे नांव नोंदणी संबंधी कोणास काही आक्षेप हरकत किंवा सुचना करावयाची असेलतर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिद्ध तारखेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यासह लेखी अर्ज करावा नंतर आ-लेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, परळी वैजनाथ

जा.क्र.४६४९/२०२६-२७
कार्यालय, नगर परिषद, परळी वै.
जिल्हा बीड, दिनांक : २०/११/२०२६

जाहिरनामा

प्रकरणः मालमत्ताकर नोंदवहित अर्जदाराचे नावाची नोंद घेणे बाबत.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, श्री/श्रीमती **शेख फेरोज शेख उमर व इतर** यांनी खालील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे घर क्र./प्लॉट/पैकी जागेस नंबर नांव नोंदविण्यास **कोर्टवारस** चे आधारे कार्यालयाकडे अर्ज केलेला आहे. घर क्र. ४४३/४३९, वार्ड क्र.८/४, शीट नं. चालता नं., सी.टी.एस.नं. , **सर्व्हे नं.** मोहल्ला : पेठ मोहल्ला, जागेची चतुर्सिमा, जागेचे मोजमाप : ३७ X १४
पुर्वेस : महेबुब कासीन
पश्चिमेस : रस्ता
दक्षिणेस : शेख अफसर उमर
उत्तरेस : शेख रशिद
सदरी घरास/जागा **शेख उमर शेख पापा** ची नोंद या कार्यालयातील मालमत्तकर नोंदवहित आहे. / यानी विक्री केली आहे. सदरी अर्जप्रमाणे नांव नोंदणी संबंधी कोणास काही आक्षेप हरकत किंवा सुचना करावयाची असेलतर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिद्ध तारखेपासून १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यासह लेखी अर्ज करावा नं

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात दि.२१ नोव्हेंबर २०२६ रोजी कार्तिकी एकादशी, दि.२४ नोव्हेंबर २०२६ रोजी गुरुनानक जयंती, दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिन तसेच दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी महात्मा फुले पुण्यतिथी इत्यादी जयंती, पुण्यतिथी व सण उत्सव साजरे होणार आहेत. सदर जयंती, पुण्यतिथी, सण, उत्सवाचे अनुषंगाने जिल्ह्यात व शहरात विविध कार्यक्रम व मिरवणुका आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात.

तसेच सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये विविध समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांच्या तसेच आरक्षण बचावाच्या अनुषंगाने तसेच दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचया प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे संपुर्ण जिल्ह्यासाठी कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केले आहे.

पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी, भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा–या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तिंचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप, विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. त्याकरीता पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि.२० नोव्हेंबर, २०२६ रोजीचे सायंकाळी ६.०० वाजेपासून ते दि.४ डिसेंबर २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

पूर्णा नदीपात्रात वाळू माफियांचा धुमाकूळ! जेसीबीने उपसा, ओव्हरलोड वाहनांची बिनधास्त वाहतूक

१७ टन क्षमतेच्या रस्त्यावरून ४० टन वाळूची वाहतूक; प्रति वाहन एक हजार रुपयांची वसुली होत असल्याचा आरोप, महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

मंठा । प्रतिनिधी

पूर्णा नदीचे पात्र कोरडे पडताच नोव्हेंबर महिन्यापासून नदीपात्रातील वाळू उपसा आणि अवैध वाहतुकीला वेग आल्याचा गंभीर आरोप होत आहे. जेसीबीच्या साहाय्याने नदीपात्रातून खुलेआम वाळू उपसा केला जात असून ट्रॅक्टर, टेम्पो, टिपर आणि हायवा यांसारख्या वाहनांतून वाळूची वाहतूक सुरू असल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, सार्वजनिक ठिकाणी वाळूचे साठे करून त्यांची विक्री केली जात असल्याची तक्रारही पुढे आली आहे. त्यामुळे पूर्णा नदीपात्रातील वाळू उपशावर महसूल प्रशासनाचे नियंत्रण आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

नदीपात्रात जाण्यासाठी शेतातून रस्ते तयार करण्यात आले असून, या मार्गाने जाणाऱ्या प्रत्येक वाहनाकडून एक हजार रुपये वसूल केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे वाळू उपशासोबतच वाहतुकीच्या मार्गावरही स्वतंत्र वसुलीचे जाळे निर्माण झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

१७ टन क्षमतेच्या रस्त्यावर ४० टनांची वाहतूक!

टाकळखोपा, वाघाळा आणि इंचा परिसरातील रस्त्यांची क्षमता अवघी १७ ते १८ टन असताना या रस्त्यांवरून तब्बल ३५ ते ४० टन वाळूची वाहतूक होत असल्याची तक्रार आहे. यासंदर्भात टाकळखोपा येथील अनिल तुकाराम चाटे यांनी २० नोव्हेंबर रोजी महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. अतिरिक्त वजनाच्या वाहनांमुळे ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था होत असून अपघातांचा धोका वाढला आहे. त्याचबरोबर वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीचा फटका शेतपिकांनाही बसत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अनेक गावांत वाळूसाठे; रात्रीच्या वाहतुकीलाही वेग?

टाकळखोपा, वाघाळा, इंचा, उस्वद, किर्ला, लिंबखेडा आणि सासखेडा परिसरात मोठ्या प्रमाणावर वाळूसाठे करण्यात आल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी परवानगीची मुदत संपल्यानंतरही वाळूची विक्री सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काही वाहनांना नंबरप्लेट नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. शिरपूर, लोणार, मंठा, सेवली, वाटूर, रिसोड आणि सेनगाव या दिशेने वाळूची वाहतूक होत असल्याचे सांगितले जात आहे.

वजनकाट्यावर वाहने तपासा; संयुक्त चौकशीची मागणी

काही ठेकेदारांना ३१ डिसेंबरपर्यंत वाळू वाहतुकीची परवानगी असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. मात्र, या परवानगीच्या नावाखाली नियमबाह्य उपसा आणि क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक होत आहे का, याची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. महसूल विभाग आणि आरटीओ विभागाने संयुक्त पथक तयार करून संशयित वाहनांचे वजनकाट्यावर प्रत्यक्ष वजन करावे, वाळू वाहतुकीच्या परवान्यांची पडताळणी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आता प्रश्न एवढाच की, पूर्णा नदीपात्रातील वाळू उपशावर प्रशासनाचा अंकुश आहे की वाळू वाहतूकदारांचेच राज्य सुरू आहे? तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते आणि प्रत्यक्षात किती वाहनांची तपासणी होते, याकडे परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळात पशुधनाचे सर्वेक्षण झाले का? चारा नियोजनाचा आधार कोणता?

शासनाच्या उपाययोजना जाहीर; मंठा तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह!

गावनिहाय जनावरांची संख्या, चारा उपलब्धता आणि पाणीटंचाईची माहिती संकलित केली का? पशुपालकांचा प्रशासनाला सवाल

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यात यंदा पावसाने पाठ फिरवल्याने शेतीबरोबरच पशुधनाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांच्या हातातील खरीप पिके वाया गेली असून जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे पशुपालकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत पशुसंवर्धन विभागाने दुष्काळी परिस्थितीचा विचार करून गावनिहाय पशुधन सर्वेक्षण करणे आवश्यक होते. मात्र मंठा तालुक्यात असे सर्वेक्षण झाले आहे का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांचा शासन निर्णय जारी केला आहे. यामध्ये चारा उत्पादन, चारा बँकांची स्थापना, मुरघास निर्मिती, पर्यायी चारा स्रोत विकसित करणे तसेच गरजेनुसार चारा छावण्या सुरू करण्याच्या उपाययोजनांचा समावेश आहे. जिल्हा वार्षिक योजनेतील किमान पाच टक्के निधी चारा उत्पादन व संवर्धनासाठी उपलब्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

मात्र या सर्व उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वप्रथम तालुक्यातील पशुधनाची अचूक आकडेवारी असणे गरजेचे आहे. कोणत्या गावात किती गायी, म्हशी, बैल, शेळ्या आणि मेंढ्या आहेत? उपलब्ध चारा किती दिवस पुरणार आहे? कोणत्या गावात पाणीटंचाई अधिक आहे? किती पशुपालकांना चारा छावणी किंवा अनुदानाची आवश्यकता आहे? या प्रश्नांची उत्तरे सर्वेक्षणातूनच मिळू शकतात.

सर्वेक्षणाशिवाय चारा नियोजन कसे?

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाची संख्या आणि चाऱ्याची गरज लक्षात न घेता नियोजन केले, तर अनेक गरजू पशुपालक शासकीय मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने प्रत्येक गावात प्रत्यक्ष जाऊन पशुधनाची नोंद, चाऱ्याची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याची परिस्थिती तपासणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, शासनाने चारा छावण्यांच्या व्यवस्थापनासाठी डिजिटल नोंदणी, बायोमेट्रिक किंवा क्यूआर कोड आणि सीसीटीव्ही देखरेखीची तरतूद केली आहे. मात्र छावणी सुरू करण्यापूर्वी कोणत्या गावात किती जनावरांना त्याची गरज आहे, याचा वस्तुनिष्ठ अहवाल असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

पशुसंवर्धन विभागाने स्पष्ट करावे!

मंठा तालुक्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे गावनिहाय सर्वेक्षण करण्यात आले आहे का? सर्वेक्षण झाले असल्यास तालुक्यातील एकूण पशुधनाची संख्या किती? चारा टंचाई असलेल्या गावांची संख्या किती? किती पशुपालकांना चारा बियाणे व मुरघास योजनेचा लाभ देण्यात आला? चारा छावण्या सुरू करण्याबाबत काय नियोजन आहे? सर्वेक्षण झाले नसेल तर चारा टंचाई निवारणाचा कृती आराखडा नेमका कोणत्या आकडेवारीच्या आधारे तयार करण्यात आला?

दुष्काळ केवळ शेतातील पिकांचा नसतो, तर तो पशुधनाच्या जगण्याचाही प्रश्न असतो. शेतकऱ्यांसाठी मदतीच्या घोषणा होत असताना मुक्या जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्न दुर्लक्षित राहता कामा नये. त्यामुळे मंठा तालुका पशुसंवर्धन विभागाने पशुधन सर्वेक्षणाची वस्तुस्थिती आणि शासनाच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा अहवाल जाहीर करावा, अशी मागणी पशुपालकांमधून होत आहे.

दुष्काळ निवारणासाठी तातडीच्या उपाययोजना करा; आ.हिकमत दादा उढाण

जालना । प्रतिनिधी



जालना येथील तहसिल कार्यालयात घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील जालना तालुक्यातील ४२ गावाचा दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आ. हिकमत उढाण यांनी पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था तसेच दुष्काळ निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत विविध मुद्दे मांडले. आणि त्यावर तात्काळ उपयोजना करण्याचे आदेश दिले

यावेळी केवळ टँकरद्वारे तात्पुरता पाणीपुरवठा न करता भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी कायमस्वरूपी पाणी नियोजन करण्याची गरज आमदारांनी व्यक्त केली. ज्या गावांना पाण्याची आवश्यकता आहे, त्या गावांमध्ये टँकरची व्यवस्था करण्यासोबतच गुरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता करून देण्यावर भर देण्यात आला. गुरांसाठी सर्वकलनिहाय चारा छावण्या सुरू करण्याचे नियोजन करावे, अशी सूचना करण्यात आली. तसेच जलसंधारणाच्या माध्यमातून ओढे–नाले खोलीकरण व रुंदीकरण, बंधारे बांधणे आदी कामांना प्राधान्य देऊन पावसाचे पाणी अडविण्याचे आणि जिरविण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. प्रत्येक गावात किमान २०० जलतारा तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवून भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचनाही आमदार हिकमत दादा उढाण यांनी मांडली. यासोबतच शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी शेतकरी संवाद मेळावे आयोजित करून त्यांच्या समस्या प्रशासनासमोर मांडण्यावरही त्यांनी भर दिला.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा आणि जलसंधारण या तिन्ही बाबींवर तातडीने उपाययोजना करून शेतकरी व ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार हिकमत दादा उढाण यांनी यावेळी केले. या बैठकीस तालुका प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते, महसूल, पंचायत समिती, महावितरण व कृषी विभागाचे कर्मचारी, तालुक्यातील ग्रामस्थ, शेतकरी बांधव तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मिल्लत नगर परिसरात कदीम जालना पोलिसांची धडक कारवाई; १९ हजार ५०० रुपयांच्या तीन तलवारींसह तरुण जेरबंद

जालना । ज्ञानेश्वर साळुंके



जालना जिल्ह्यातील गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने अवैधरीत्या धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या तरुणास कदीम जालना पोलिसांनी सापळा रचून बेड्या ठोकल्या आहेत. शुक्रवारी (दि.२०) दुपारी मिल्लत नगर, जुना जालना परिसरात ही कारवाई करण्यात आली असून पोलिसांनी आरोपीकडून एकूण १९ हजार ५०० रुपये किमतीच्या तीन धारदार तलवारी जप्त केल्या आहेत. आफताब अफसर मणयार (वय २०, रा. मिल्लत नगर, जुना जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना एका तरुणाकडे घातक शस्त्रे असून तो मिल्लत नगर परिसरात फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ परिसरात सापळा रचला आणि संशयित तरुणाला ताब्यात घेतले. पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक तलवार सापडली, तर त्याच्या घराची झडती घेतली असता आणखी दोन तलवारी मिळून आल्या. पोलिसांनी तिन्ही तलवारी जप्त केल्या असून प्रत्येक तलवारीची किंमत ६ हजार ५०० रुपये प्रमाणे एकूण १९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सदा राठोड करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे.बी. शेवाळे, पोहेकॉ सदा राठोड, सचिन चौधरी, धनाजी कावळे, पोकॉ मतीन शेख, इम्रान खान, नंदकिशोर टेकाळे, कृष्णा चव्हाण, अजीम अंसारी, मपोकॉ शिवकन्या बोराडे आणि अशोक खरात यांच्या पथकाने केली.

मनोज जरांगे पाटील यांची उबाळे पाटील गोदावरी इंटरियरच्या कार्यालयाला सदिच्छा भेट

जालना । प्रतिनिधी



मराठा आरक्षणा साठी अहोरात्र परिश्रम करून प्रामाणिकपणे संघर्ष करणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी दुपारी कृष्णा प्लाझा रेल्वे स्टेशन रोडवरील गोदावरी इंटरियरच्या कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या. गोदावरी डिझायनर्स इंटरियर चे प्रोप्रायटर संचालक सत्यजित उबाळे पाटील, मनोज उबाळे पाटील तसेच काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक उबाळे पाटील व उबाळे पाटील परिवाराच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ हार घालून परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच संघर्ष योद्धा मनोज जारंगे पाटील यांचे उबाळे पाटील परिवाराच्या वतीने औक्षण करण्यासाठी अरुणा उबाळे पाटील, पुनम गायकवाड पाटील, अनुराधा ननवरे पाटील, राजनंदनी कावळे पाटील या उपस्थित होत्या. त्यांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले.

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक उबाळे पाटील व संपूर्ण उबाळे पाटील परिवाराच्या वतीने त्यांचा मानसन्मान करण्यात आला. पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. मनोज उबाळे पाटील, सत्यजित उबाळे पाटील, अशोक उबाळे पाटील या संपूर्ण उबाळे पाटील परिवाराने जो नवीन व्यवसाय सुरू केला. त्या व्यवसायाच्या अनुषंगाने मनोज जारंगे पाटील वेळात वेळ काढून या कार्यालयाला भेट देण्यासाठी उपस्थित झाले. त्यांनी उबाळे पाटील परिवाराशी संवाद साधून नवीन सुरू केलेल्या या व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या या व्यवसायाच्या माध्यमातून भविष्यात उत्तरात उत्तर प्रगती आपण साधावी आणि यशाची नवनवीन शिखरे आपण गाठावीत अशा त्यांनी शुभेच्छा दिल्या. मनोज जरांगे पाटील यांनी वेळात वेळ काढून या नवीन व्यवसायाला शुभेच्छा देण्यासाठी उबाळे पाटील यांच्या कार्यालयात वेळ काढून भेट दिली त्याबद्दल उबाळे पाटील परिवार यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

या दरम्यान दैनिक जगमित्र चे मुख्य संपादक बाळासाहेब कडबाणे पाटील, ज्येष्ठ पत्रकार मकरंद जागीरदार, दैनिक जगमित्र जालना जिल्हा आवृत्ती संपादक विष्णू कदम, विशेष प्रतिनिधी महेश नंद यांचाही शाल श्रीफळ देऊन अशोक उबाळे पाटील यांनी यावेळी सत्कार केला. याप्रसंगी त्यांच्यासोबत माजी उपनगराध्यक्ष सुनील बापू आर्दड, युवा नेते प्रशांत वाडेकर, रमेश गजर, गणेश शिंदे, विजय शेळके, संभाजी पांडुळे संभाजी देशमुख, विनोद दिव्यवीर, अनिल मस्के, पांडुळे माऊली, नंदू दाभाडे, लक्ष्मण मुळे, अभिषेक कावळे पाटील सातभाई बाजवाहा आदी मान्यवर त्यांच्यासोबत उपस्थित होते.

सरपंच दत्ताभाऊ चव्हाण यांची शेतकरी संघाच्या जालना जिल्हा अध्यक्षपदी निवड

जालना । प्रतिनिधी



नंदापूर येथील माजी सरपंच दत्ताभाऊ चव्हाण हिंदी गावात केलेल्या विकास कामाच्या अनुषंगाने शासनाने त्यांना प्रगतशील शेतकरी म्हणून राष्ट्रपतीचे हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

दत्ताभाऊ चव्हाण पंचक्रोशी मध्ये शेतकऱ्यांना सतत मार्गदर्शन करत आले आहे यांनी गावामध्ये त्याचबरोबर पंचक्रोशी मध्ये जालना तालुका आणि जालना जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना विविध क्षेत्रात मार्गदर्शन केल्यामुळे आणि सतत मार्गदर्शन करत असल्यामुळे जालना जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांनी त्यांचे शेतकरी संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड केली आहे. शेतकरी संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांची सह्याद्री फाउंडेशन च्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या त्याचबरोबर सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

निवेदन देऊनही कारवाई नाही; अधिकाऱ्यांना दुष्काळाचा विसर?

कोतवाल नियुक्ती करायची नसेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच पदभार घेऊन दुष्काळ निवारणात सहकार्य करावे, नागरिकांची मागणी

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील कोतवालांना त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणीच कामे द्यावीत, या मागणीसाठी तहसीलदार, मंठा यांना दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, निवेदन देऊन सुमारे २५ दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

तालुक्यात सध्या दुष्काळी परिस्थिती असतानाही अधिकाऱ्यांना दुष्काळाचा विसर पडला आहे का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील कोतवालांची नियुक्ती ही संबंधित गावासाठी करण्यात आलेली आहे. शासनाच्या नियमानुसार कोतवालाचे मुख्य काम हे गावपातळीवर तलाठी यांना महसूल कामकाजात मदत करणे हे आहे. परंतु सध्या अनेक कोतवालांना त्यांच्या नियुक्तीच्या गावी कामे न देता तहसील कार्यालय व इतर ठिकाणी कामे दिली जात आहेत. त्यामुळे मूळ गावातील कामे खोळंबली आहेत. दुष्काळामध्ये गावपातळीवरील कामे करायची कोणी, असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. पाणी टंचाई, चारा छावणी, दुष्काळी अनुदान, पीक पाहणी यासारखी महत्त्वाची कामे गावातच करावी लागतात. कोतवाल गावात नसल्याने ही कामे वेळेवर होत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



नागरिकांची मागणी

सर्व कोतवालांना त्यांच्या नियुक्ती आदेशावर असलेल्या मूळ गावीच कामे देण्यात यावीत. त्यांना तहसील व इतर कार्यालयीन कामातून मुक्त करून गावपातळीवर रुजू करावे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन गावात त्यांची उपस्थिती अनिवार्य करावी.

आणि जर कोतवालाची नियुक्तीच करायची नसेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः पदभार घेऊन गावपातळीवर येऊन दुष्काळ निवारणात सहकार्य करावे, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जालना व उपविभागीय अधिकारी, परतूर यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. निवेदन देऊनही कारवाई न झाल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कोतवालांना मूळ गावी रुजू करावे, अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६ उद्घाटन उत्साहात संपन्न

जालना । प्रतिनिधी



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६ चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. युवक-युवतींच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच भारतीय संस्कृती, कला व परंपरेचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

या महोत्सवाचे उद्घाटन युवा शाहीर रामानंद उगले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार होते. यावेळी डॉ. संदीप राठोड, राहुल कासोदे, विजय गाडेकर (जिल्हा सचिव, तलवारबाजी संघटना), संग्राम तारडे, सदाशिव पांडुरे (माजी नायब तहसीलदार) तसेच विविध स्पर्धांचे पंच व परीक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांनी उपस्थित युवक-युवतींना मार्गदर्शन केले. युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळते. अशा उपक्रमांमुळे त्यांच्यातील कलात्मकता, आत्मविश्वास, सर्जनशीलता व नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

या युवा महोत्सवामध्ये समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, चित्रकला, पथनाट्य व कविता लेखन या विविध कला व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सहभागी स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परीक्षक व पंच यांनी स्पर्धकांच्या सादरीकरणाचे परीक्षण करून गुणवत्तेनुसार मूल्यमापन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुन्नुलाल विठोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा अधिकारी यांनी केले.

सदर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धार्थ कदम, राज्य क्रीडा मार्गदर्शक, श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा अधिकारी, संतोष प्रसाद, अमोल मुसळे, वरिष्ठ लिपिक, राहुल राठोड, कनिष्ठ लिपिक, राहुल गायके, हारून खान, भानुदास लांडगे, विजय कांबळे, श्रीमती लताबाई लांडगे, श्रीमती सिंधू लांडगे तसेच कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



डोंगरशेळकी ग्रामपंचायतीच्या कारभाराची होणार सखोल चौकशी; पंचायत समितीचे आदेश

चौकशी समितीकडे सर्वांचे लक्ष; प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मारोती केंद्रे यांचे बेमुदत उपोषण तात्पुरते स्थगित; अनियमिततेच्या आरोपांबाबत प्रत्यक्ष पाहणी व कागदपत्रांची तपासणी होणार

उदगीर । पाटील मनेश

उदगीर तालुक्यातील डोंगरशेळकी ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित अनियमितता, विविध विकासकामांवरील खर्च आणि शासकीय निधीच्या विनियोगाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची अखेर पंचायत समिती प्रशासनाने दखल घेतली आहे. ग्रामपंचायतीच्या विविध कामांची सखोल व निष्पक्ष चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश पंचायत समिती, उदगीर प्रशासनाने दिले आहेत. प्रशासनाकडून चौकशीबाबत लेखी आश्वासन मिळाल्यानंतर तक्रारदार मारोती कोंडीबा केंद्रे यांनी २० नोव्हेंबर रोजी आपले बेमुदत उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

गावातील मूलभूत सुविधांची दुरवस्था, विकासकामांवरील खर्चाबाबत निर्माण झालेले प्रश्न, बंद असलेले आर.ओ. केंद्र आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीतील कथित अनियमितता या मुद्द्यांवरून मारोती केंद्रे यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र, अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप करीत त्यांनी १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाला ग्रामस्थांचा, विशेषतः गावातील तरुणांचा वाढता पाठिंबा मिळत होता. उपोषणस्थळी आरोग्य विभागाच्या पथकाने तसेच पोलीस प्रशासनाने भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती. मागण्या मान्य होऊन ठोस कार्यवाही होत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याची भूमिका केंद्रे यांनी घेतली होती.



चौकशीमध्ये या प्रमुख मुद्द्यांचा समावेश

पंचायत समिती, उदगीर यांच्या २० नोव्हेंबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार ग्रामपंचायतीच्या विविध कामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे चौकशी करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन दुरुस्ती : दुरुस्तीच्या कामावरील खर्च आणि गावातील कायम असलेली पाणीपुरवठ्याची समस्या यांची पडताळणी. तांडा वस्ती सुधार योजना : मंजूर निधीचा विनियोग, प्रत्यक्ष झालेली विकासकामे आणि खर्चाच्या नोंदींची तपासणी. सीसीटीव्ही खरेदी व बसविणे : खरेदी केलेले साहित्य, प्रत्यक्ष बसविण्यात आलेले कॅमेरे आणि संबंधित कामाची पाहणी. घनकचरा व्यवस्थापन : योजनेअंतर्गत झालेली कामे, साहित्य खरेदी आणि खर्चाच्या बिलांची तपासणी. बंदिस्त नाली बांधकाम : मंजूर निधी, प्रत्यक्ष बांधकाम, कामाचा दर्जा आणि देयकांची पडताळणी. जल जीवन मिशन : गावातील अपूर्ण कामे, मंजूर निधी, झालेला खर्च आणि कामाच्या सद्यस्थितीची चौकशी. आर.ओ. केंद्र : गावातील बंद असलेले आर.ओ. केंद्र पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसंदर्भात कार्यवाही. या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

लेखी आश्वासनानंतर उपोषण तात्पुरते स्थगित

पंचायत समिती प्रशासनाकडून चौकशीचे आदेश आणि लेखी आश्वासन प्राप्त झाल्यानंतर मारोती कोंडीबा केंद्रे यांनी २० नोव्हेंबर रोजी आपले बेमुदत उपोषण तात्पुरते स्थगित केले. मात्र, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार निर्धारित मुदतीत चौकशी पूर्ण करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. दिलेल्या आश्वासनानुसार कार्यवाही झाली नाही किंवा गावातील प्रलंबित प्रश्नांकडे पुन्हा दुर्लक्ष झाले, तर लोकशाही मार्गाने पुढील आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

चौकशी समितीकडे सर्वांचे लक्ष!

डोंगरशेळकी ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत उपस्थित झालेले प्रश्न आता प्रशासकीय चौकशीच्या कक्षेत आले आहेत. त्यामुळे केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष गावात जाऊन विकासकामांची पाहणी करावी, संबंधित अभिलेख तपासावेत आणि तक्रारींची निष्पक्ष पडताळणी करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. उपोषण तात्पुरते स्थगित झाले असले तरी गावाच्या मूलभूत प्रश्नांचा लढा संपलेला नाही. चौकशी समिती प्रत्यक्षात कोणती कार्यवाही करते, चौकशीतून काय निष्पन्न होते, विकासकामांवरील खर्चाची वस्तुस्थिती समोर येते का आणि गावातील प्रलंबित प्रश्न कधी मार्गी लागतात, याकडे आता डोंगरशेळकीसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आर्वी परिसरात मद्यपी व हुल्लडबाजांचा सुळसुळाट; ग्रामपंचायतीकडे तक्रार करूनही कारवाई नाही!

रात्रीच्या आरडाओरड्यामुळे नागरिक त्रस्त; महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

लातूर । संतोष सोनवणे

आर्वी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून रात्री-अपरात्री मद्यपी आणि टवाळखोरांचा उपद्रव वाढल्याने स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. दारूच्या नशेत रस्त्यावर धिंगाणा घालणे, मोठमोठ्याने आरडाओरडा करणे, शिवीगाळ करणे तसेच रात्री उशिरापर्यंत हुल्लडबाजी करण्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याने परिसरातील शांतता धोक्यात आली आहे. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी लेखी तक्रार अर्ज सादर केला असतानाही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांना रात्री शांततेत झोप घेणेही कठीण झाले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच सकाळी लवकर कामावर जाणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी महिलांना घराबाहेर पडताना असुरक्षित वाटत असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तक्रार अर्जात घटनांच्या वेळेची नोंद या वाढत्या त्रासाला कंटाळून स्थानिक रहिवाशांनी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी ग्रामसेवकांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे. या अर्जामध्ये परिसरात घडलेल्या काही घटनांच्या तारखा आणि वेळांचाही उल्लेख करण्यात आला आहे. यामध्ये १३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११ वाजून १९ मिनिटांपासून ११ वाजून २५ मिनिटांपर्यंत मद्यपींकडून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गोंधळ घालण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच १६ ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजून ७ मिनिटांपासून ३ वाजून २३ मिनिटांपर्यंत मोठ्या आवाजात आरडाओरडा करून परिसरातील शांतता भंग करण्यात आली. तर २३ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजून ३० मिनिटांपासून मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांपर्यंत हुल्लडबाजी सुरू असल्याचेही तक्रार अर्जात नमूद करण्यात आले आहे.

बंद पथदिवे आणि अवैध मद्यविक्रीचा प्रश्न

परिसरातील काही पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन टवाळखोरांकडून उपद्रव केला जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. याशिवाय अवैध मद्यविक्रीवर नियंत्रण नसल्यामुळे मद्यपींचे प्रमाण वाढत असल्याचा आरोपही रहिवाशांकडून करण्यात येत आहे. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे

१६ नोव्हेंबर रोजी लेखी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. केवळ तक्रारी स्वीकारून चालणार नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्यक्ष उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने परिसरातील बंद पथदिवे तातडीने सुरू करावेत, अवैध मद्यविक्रीविरोधात संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा, तर पोलीस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवून मद्यपान करून सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आता ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलीस विभाग या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेतात आणि नागरिकांना या त्रासातून कधी दिलासा मिळतो, याकडे आर्वीकरांचे लक्ष लागले आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या स्मारक उभारणीला गती; विद्यापीठ स्तरावर समिती गठित होणार

लातूर । संतोष सोनवणे

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे संस्थापक कुलगुरू, लातूर पॅटर्नचे शिल्पकार आणि विचारवंत माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विद्यापीठ परिसरात स्मारक उभारण्याच्या प्रस्तावाला अधिसभेची बहुमताने मंजुरी मिळाल्यानंतर या उपक्रमाला पुढील दिशा मिळाली आहे. स्मारक उभारणीसंदर्भात विद्यापीठ स्तरावर लवकरच समिती गठित करण्यात येणार असून, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली समिती पुढील कार्यवाही करणार आहे.

या संदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे विचार मंचच्या शिष्टमंडळाची बुधवारी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत अधिसभेत मंजूर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने स्मारकाच्या नियोजनासह पुढील प्रक्रिया सुरू करण्याबाबत बैठकीत विचारविनिमय झाला. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. संस्थापक कुलगुरू म्हणून त्यांनी विद्यापीठाची शैक्षणिक आणि प्रशासकीय पायाभरणी केली. त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि योगदानाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठ परिसरात स्मारक उभारण्याची मागणी करण्यात आली होती. अधिसभेत या प्रस्तावाला मान्यता मिळाल्याने स्मारक उभारणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.



कुलगुरू डॉ. चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावित समिती स्मारकाच्या स्वरूप, जागा, नियोजन आणि उभारणीसंदर्भातील बाबींचा विचार करणार आहे. विद्यापीठाच्या संस्थापक कुलगुरूंच्या स्मृती जतन करण्याबरोबरच त्यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक योगदान अधोरेखित करणारे स्मारक उभारण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या बैठकीस स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, अधिसभा सदस्य डॉ. अशोक मोटे, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, डॉ. विनोद चव्हाण आणि प्रा. सुधीर साळुंखे उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' जाहीर

२७ नोव्हेंबरला राज्यपालांच्या हस्ते होणार वितरण

उदगीर । पाटील मनेश

माजी मंत्री तथा उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे यांना मुंबई येथील साईदिशा प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. उदगीर मतदार संघाचा कायापालट करुन देशाच्या नकाशावर उदगीरचे नाव कोरले. सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राला दिलेले पाठबळ. सार्वजनिक जीवनातील त्यांचे उल्लेखनीय कार्य, शासनाच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळताना जनकल्याणासाठी दिलेले योगदान तसेच समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष दत्तात्रय बाळकृष्ण माने यांच्या माध्यमातून सन २००० पासून सामाजिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येतात. सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.



शुक्रवार, दि.२७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता, यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. यावेळी आमदार संजय बनसोडे यांना 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्यास राज्यपाल, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

साईदिशा प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला जाणार आहे. यामध्ये शासकीय सेवेसाठी 'सेवा रत्न पुरस्कार' महेंद्र कल्याणकर (ख-ड), विनिता देव सिंघल (ख-ड), अशोक काकडे (ख-ड), सुरज मांढरे (ख-ड), सुहास दिवसे (ख-ड), अजित कुमार (ख-ड) आणि स्वाती म्हसे पाटील (ख-ड) यांना प्रदान करण्यात आला आहे. 'रणझुंजार पुरस्कार' विजय सिंह (खझड) आणि बजरंग बनसोडे (ऊझ) यांना जाहीर करण्यात आला आहे. अभिनय आणि चित्रपट क्षेत्रातील अनुपम खेर, सुनील शेट्टी, काजल अग्रवाल, अशोक सराफ, सयाजी शिंदे, भाऊ कदम, साई ताम्हणकर, मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, मोहन जोशी, रोहिणी हट्टंगडी, भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, दिलीप प्रभावळकर, कविता लाड, मकरंद अनासपुरे यांच्यासह अनेक कलाकारांचा पुरस्कारार्थींच्या यादीत समावेश आहे.

गायक - शंकर महादेवन, कुमार सानू, वैशाली सामंत, अजय-अतुल, सुरेश वाडकर, हृदयनाथ मंगेशकर, पियुष पानवर, स्वप्नील बांदोडकर, श्रीनिवास खळे, जगदीश खेबुडकर, यशवंत देव यांना नटसम्राट बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यांच्यासह अभिनय क्षेत्रातील अभिनेते, शासकीय सेवेतील अधिकारी, गायक, बालकलाकार व वैद्यकीय सेवेतील विविध मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

नगररचना विभागाच्या कामकाजात सुलभता, बांधकाम परवानगी प्रक्रिया गतिमान करण्यासाठी स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांची महत्त्वपूर्ण बैठक

लातूर । प्रतिनिधी

आज दिनांक २० नोव्हेंबर रोजी स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी नगररचना विभागाची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली. या बैठकीमध्ये १५० चौ.मी. वरील प्लॉटसाठी खासगी इंजिनिअरमार्फत मान्यता देण्याबाबत सूचना करण्यात आल्या. तसेच या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस उपायुक्त पंजाबराव खानसोळे, सर्व क्षेत्रीय अधिकारी, सर्व अभियंते, नगररचनाकार अक्षय तळतकर व नगररचना विभागातील अधिकारी, अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी तसेच क्रेडाई असोसिएशनचे अध्यक्ष उपस्थित होते.



बैठकीमध्ये बांधकाम परवानगीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व जलद करण्याच्या दृष्टीने पुढील महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या. १५० चौ.मी. वरील प्लॉटसाठी खासगी इंजिनिअरमार्फत मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत कार्यवाही करणे. लो रिस्क प्रकरणांसंदर्भात बँकांना अधिकृत पत्र देणे. डॉक्युमेंट व पेमेंट व्हेरिफिकेशनसाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार प्रदान करणे. बीपीएमएस प्रणालीसाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे. लो रिस्क प्रकरणांमध्ये बँकांना आवश्यक वैयक्तिक प्रत उपलब्ध करून देणे. संबंधित प्रक्रियेनुसार अंतिम ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करणे.

अग्निसुरक्षेबाबत मॉक ड्रिल व कार्यशाळेचे आयोजन

यावेळी अग्निसुरक्षेच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण निर्णय व सूचना करण्यात आल्या. पुढील महिन्यामध्ये अग्निशमन विभागाच्या वतीने फायर सेफ्टीसंदर्भात मॉक ड्रिल व विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून नागरिक, व्यापारी, व्यावसायिक प्रतिष्ठाने, इमारत मालक व संबंधित घटकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच ज्या मालमत्ता व आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षेच्या आवश्यक उपाययोजनांची पूर्तता झालेली नाही, त्यांना अग्निसुरक्षेच्या नियमांची पूर्तता करण्यासाठी ३० ते ६० दिवसांचा कालावधी देण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. दिलेल्या मुदतीत आवश्यक अग्निसुरक्षा उपाययोजना पूर्ण न केल्यास नियमानुसार संबंधित मालमत्ता सील करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

नागरिकांना दिलासा आणि सुरक्षित शहरासाठी पुढाकार

नगररचना विभागातील परवानगी प्रक्रिया सुलभ करणे, बांधकाम व्यावसायिक व इंजिनिअर्सच्या अडचणी दूर करणे, बँकांना आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता करून देणे आणि अग्निसुरक्षेच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे, या सर्व बाबींना प्राधान्य देण्याच्या सूचना स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नागरिकांना जलद व पारदर्शक सेवा मिळण्याबरोबरच शहरातील प्रत्येक इमारत व आस्थापना अग्निसुरक्षित असावी, यासाठी प्रशासन, बांधकाम व्यावसायिक आणि नागरिक यांच्या समन्वयातून काम करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

औसा तालुक्यातील अवैध सावकारांविरुद्ध गोपनीय तक्रारी नोंदवण्याचे सहायक निबंधकांचे आवाहन

लातूर । प्रतिनिधी

औसा तालुक्यातील विनापरवाना अवैध सावकारी व्यवहारांसंबंधीच्या तक्रारींच्या चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत औसा तालुक्यातील नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

औसा तालुक्यातील अवैध सावकारी व्यवहारांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याकरिता सहकारी विभागाचे जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात तक्रार दाखल करून अशा व्यक्तींची माहिती द्यावी, असे या आवाहनात म्हटले आहे. या प्रक्रियेत तक्रारदाराचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल आणि प्राप्त माहितीच्या आधारे संबंधित अवैध सावकारांवर तात्काळ आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे औसा येथील सहकारी संस्थेचे सहायक निबंधक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

लातूर महानगरपालिकेचा जन्म - मृत्यू विभाग सुट्टी दिवशी सुद्धा राहणार कार्यरत

लातूर । प्रतिनिधी

दिवाळीच्या सुट्ट्यामुळे जन्म प्रमाणपत्र घेण्यासाठी नागरीकांची गर्दी वाढली आहे. नागरीकांच्या गैरसोयीची दखल घेत लातूर शहर महानगरपालिकेचा जन्म-मृत्यु विभाग दिनांक २१/११/२०२६ व २२/११/२०२६ वार शनिवार व रविवार या दोन्ही सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरु ठेवणेचे आदेश आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी दिले आहेत. तरी गरजू नागरिकांनी जन्म-मृत्यु प्रमाणपत्र घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

राजकीय वरदहस्त आणि प्रशासकीय आधार...?

औसा तालुक्यातील व्हीबी-जी रामजी ऑपरेटरचा कथित कारनामा; शासनाच्या नियमांची पायमल्ली, रोजगार हमी योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह!

औसा । प्रतिनिधी

व्ही बी जी रामजी अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामकाजात औसा तालुक्यात धक्कादायक प्रकार समोर येत असल्याची चर्चा आहे. कामावर प्रत्यक्ष मजूर न येताच मी हजेरी भरून देतो, फक्त ५० हजार रुपये द्या, अशी मागणी व्हीबी-जी रामजी योजनेतील संबंधित ऑपरेटरने केल्याचा गंभीर आरोप होत आहे. या कथित प्रकारामुळे शासनाच्या नियमांना हरताळ फासला जात असल्याचा प्रश्न सध्या औसा तालुक्यात उपस्थित झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोजगार सहाय्यकाने केवळ कामाची मागणी नोंदवावी, पुढील हजेरी भरण्याचे काम मी माझ्या पद्धतीने पाहून घेतो, अशी भूमिका संबंधित ऑपरेटरकडून घेतली जात असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, यासाठी ५० हजार रुपयांची मागणी केल्याची चर्चा असून, या प्रकारामुळे लाभार्थ्यांना मागील पाच ते सहा महिन्यांपासून प्रतीक्षेत ठेवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. सदरील ऑपरेटर हा राजकीय वरदहस्त प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आणि राजकीय पदाधिकाऱ्यांचेही मर्जी संपादन करून असल्याची चर्चा जोरदार सुरू आहे.



दरम्यान, औसा तालुक्यात काही मस्टर झिरो असल्याची बाबही समोर येत आहे. रोजगारासाठी इच्छुक असलेल्या मजुरांना काम मिळण्याऐवजी प्रशासकीय प्रक्रियेतच अडकवले जात असल्याने रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या नियमांनुसार प्रत्यक्ष काम, मजुरांची उपस्थिती आणि हजेरी यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. असे असताना पैशांच्या कथित मागणीवरून हजेरी भरण्याचे आश्वासन दिले जात असेल, तर हा प्रकार गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून संबंधित ऑपरेटरच्या कामकाजाचे लेखापरीक्षण करावे आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. ऑपरेटरच्या मनमानीला वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आशीर्वाद ? की प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे? असा सवालही आता उपस्थित होत आहे. सदरील ऑपरेटर दैनंदिन कामकाजामध्ये कार्यालयीन वेळेत अनेकवेळा कार्यालयीन कामकाज सोडून अनुपस्थित राहने इतर कामांमध्ये व्यस्त असल्याची चर्चा आहे. तर अशा मनमानी करणाऱ्या ऑपरेटरवर गटविकास अधिकारी यांनी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून आवश्यकतेनुसार बदलीसाठीही शिफारस करावी अशी चर्चा सध्या कार्यालयात आणि तालुक्यामध्ये जोरदार सुरू आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खाडगांव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

इंदिराजींच्या कणखर धोरणातून राष्ट्रीय एकात्मतेला चालना : प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी

देगलूर । अजीम अन्सारी

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळातील अंतर्गत कणखर धोरणातून राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळाली, असे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने इंदिरा गांधी जयंती निमित्त १९ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय एकात्मता दिन कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथम इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, डॉ. सदानंद ऐताल, डॉ. विश्वनाथ कंधारे, प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. मारुती बामणे, डॉ.सौ. पुष्पा गायकवाड, डॉ. दिगंबर कुलकर्णी, प्रा.सौ.अंजली रोयलावार यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, संस्थानिकांचे तनखेबंदी तसेच बँका, कोळसा उद्योग, विमा कंपन्या इत्यादींचे राष्ट्रीयकरण यासारखे व तत्सम खंबीर निर्णय घेऊन इंदिरा गांधी यांनी आर्थिक विषमतेला तिलांजली देण्याचा केलेला प्रयत्न महत्त्वपूर्ण होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.दिगंबर कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रा.सौ. अंजली रोयलावार यांनी मानले.

जनतेचा जीव धोक्यात, प्रशासन मात्र सुस्त! हिंगोली गेट ते वाजेगाव पुलाच्या कामावरून संतापाचा उद्रेक!

कंत्राटदाराची मनमानी की प्रशासनाची मेहरबानी? नांदेडकरांच्या हालअपेष्टांविरोधात १ डिसेंबरला आंदोलन!

नांदेड । प्रतिनिधी

राज्यात सर्वात गलिच्छ राजकारण आणि भ्रष्ट, विषारी आणि द्वेषपूर्ण राजकीय नेतेगन आणि प्रशासनावर धाक धपटीचे दडपण आणून दबदबा निर्माण करणारा पहिला जिल्हा बीड येतो तर दुसऱ्या क्रमांकावर नांदेडचा नंबर लागतो. नांदेड जिल्हयातून देशपातळीवर आणि राज्याची कमान ६५ वर्षापासून नांदेडकर देत आले आहेत. मात्र नांदेडचा जसा विकास व्हावा तसा दिसत नाही. उलट जेवढ्या समस्याचे डोंगर नांदेडकरासमोर आहेत तेवढ्या समस्या बीड जिल्ह्यावर नसतील. यामुळे नांदेडकर आज पश्चाताप आणि दुःख व्यक्त करीत आहेत. आज दोन खासदार आणि पाच आमदार असूनही नांदेडकरांना नरक यातना सहन कराव्या लागत आहे. हे आमचे दुर्दैव असल्याची खंत जनतेतून प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. ही लोकप्रतिनिधी फक्त आपले घर भरण्यास आणि अमाप संपती कमविने हाच उद्योग सुरू केला आहे. एका आमदाराने तर जालना येथील एक स्टील कंपनी ५०० करोड मध्ये खरेदी घेतली असल्याचे धक्कादायक वृत् हाती आले आहेत. तर एका खासदाराने नोटबंदीच्या वेळी ब्लॅकमणी व्हाईट करण्यातून अरबो रुपयाचे घबाड कमविले आहे. तर दुसऱ्या खासदाराकडे स्वतःची प्रॉपर्टी किती आणि कुठेकुठे आहे ते त्याला सुधा त्याची जाणीव नाही.आणि एका







खासदाराने चक्क पाच करोड रुपये स्वतःच्या शेतात बिनकामी थोड्या प्रमाणात खर्च करून थेट ५ करोड रुपये गबन घोटाळा केलेला आहे. म्हणजे एक टर्म निवडून या आणि अरबोपती व्हा हीच ऑफर सध्या राजकारणात सुरू आहे.

हिंगोली गेट ते वाजेगांव पुलाचे बांधकाम सुरू झाले आहेत. आज चार महिन्यापासून वाहनधारक आणि दुकानदारासहीत आम जनतेला प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. ज्यासाठी कोणत्याच लोकप्रतिनिधी अथवा पक्षाने किंवा. संघटनेने याबाबत पुढाकार घेतला नाही. ज्याची नोंद जयहिंद ऑटो सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक नांदेड चौफेरचे संपादक डॉ मोहम्मद आरीफखान पठाण यांनी पुढाकार घेऊन नांदेडकरांना त्याची जाणीव करून देण्याचे काम केले आहेत. यासाठी त्यांनी काल नांदेडचे जिल्हाधिकारी सहित महापालिका आयुक्त. रेल्वे प्रबंधक. सार्वजनिक बांधकाम विभाग. यांना झोपेतून उठवून जागे करण्याचे धाडस दाखविले आहे. तसे ठऊ किरण अंबेकर यांना तक्रार देत त्वरीत नियोजन करण्यात यावे. अन्यथा एक डिसेंबर रोजी देगलूर नाका चौरस्त्यावर आंदोलन करून काम बंद पाडण्यात येतील असा इशारा दिलेला आहे. यासाठी सर्व नागरिकांनी. दुकानदारांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहेत.

रेल्वे स्थानकावरील ऑटो थांबा पूर्ववत सुरू करण्यात यावा.!

रेल्वे स्थानक असो की बस स्थानक असो तेथे प्रवाश्यांसाठी ऑटो थांबा असतो तशी नियमात तरतूद आहे. ग्राहक हे कोणतेही असो त्यास प्रथम मान मिळतो. त्या अन्वये रेल्वे स्थानकावर ऑटो थांबा रेल्वे स्टेशन अंमलात आल्यापासून होता. मात्र मागील रेल्वे प्रबंधक यांच्या डोक्यातील आणि ठझक्र पोलिसांची भूमिका संशयास्पद असून त्यांनी चिरीमिरी घेऊन ऑटो थांबा मागे देऊन स्थानका समोर चारचाकी वाहन पार्किंगसाठी दिली आहे. त्या वाहन पार्किंग चालकाने त्यास तारेचे कुंपण घालून रेल्वे स्थानकाचे विद्रुपीकरण केले आहेत. नांदेड रेल्वे स्थानक चकचकीत दिसणारा आणि नंबर वन असलेल्या स्थानकाला तारेचे कुंपण घालून रेल्वे प्रशासन काय साध्य करू पाहत आहे. यासाठी जनता लढा का उभारत नाही. सर्व प्रकारचा त्रास सहन करण्याची क्षमता नांदेडकरांनी विडा उचलला आहे काय तो ऑटो थांबा जनता आणि रेल्वे प्रवाशांचे सुरक्षा कवच आहे. जो यात कोणीही तडजोड करू शकत नाही. मग रेल्वे प्रबंधक यांच्या डोळ्यात माती गेली आहे का त्यांना दिसत नसावी. ज्याची तक्रार फोटो सहित केंद्रीय रेल्वेमंत्री यांना पाठवली आहे. जो रेल्वे प्रबंधक आणि ठझक्र पोलिसांची मनमानी आणि हफ्तेखोर भूमिका साकारत आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ स्पीड ब्रेकर गरजेचे.!

रेल्वे स्टेशन समोरील चौरस्ता डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा हा शहराला जोडणारा मुख्य केंद्रबिंदू मानला जातो. जो बस स्थानक याच लाईनवर आहे. त्यामुळे रेल्वे मधून प्रवाशी उतरताच थेट चौरस्त्यावर येतात. ज्यामुळे खाजगी चारचाकी वाहने. ऑटो रिक्षा. मोटर सायकल. बसेस. वेगाने धावतात ज्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. ज्यामुळे सुखकर प्रवास आणि प्रवाशी सुरक्षित आपापल्या घरी पोहचणे यासाठी त्या चारही बाजूंनी स्पीड ब्रेकर बसविण्यात यावे. तसेच मामाचौक यशोसाई हॉस्पीटल बाहेरील कमानीसमोर मुख्य रस्त्यावर आणि पोलिस उपमहानिरीक्षक कार्यालय कौठा चोरस्त्यावरील पूर्वीचे स्पीड ब्रेकर दुरवर झाल्याने वाहनाचा वेग वाढत आहे. ज्यामुळे दररोज तिथे एक ना एक अपघात होत असतो. कारण हा रस्ता अवैध्य रेती वाहतुकीची लाइफ लाइन मानली जाते. या ठिकाणी ट्रॅफिक सिग्नल सुरू करून वाहतूक पोलिस नेमणे.या भागात भरधाव टीप्परमुळे अनेक अपघात झाले आहेत तरीही कोणत्याच प्रशासनाचे डोळे उघडले नाहीत. कौठा येथील डी मार्ट समोर आणि महात्मा बसवेश्वर पुतळ्यासमोर ऑटो थांबा. देगलूर नाका फेमस फंक्शन हॉल जवळ व खुदबाई नगर येथे ऑटो थांबा देण्यात यावा. अशी मागणी केलेली आहे. या शिष्टमंडळात जयहिंद ऑटो सेनेचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद साजिदराज आणि सर्व जयहिंद ऑटो सेनेचे पदाधिकारी. शाखा प्रमुख उत्तर दक्षिण शहर अध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते.

१ डिसेंबर काम बंद पाडण्यासाठी सर्व नागरिकांनी सहभाग घ्यावा...

सदरील त्रास हा ऑटो चालकानाच नाही तर इतर वाहन धारक, दुकानदार, सहित अन्य नागरिकांना याचा सामना करावा लागत आहे. दोन्ही बाजूंनी पक्के रस्ते नसल्याने धुळीचे साम्राज्य पसरले असून त्या धुळीचे कण आणि माती आपल्या श्वासाद्वारे फुफ्फुसात जाते. त्यामुळे अनेक आजार जडत आहे. श्वास घेण्यास त्रास उद्भवणे. फुफ्फुसाचे आजार होणे. अस्थमा. दमा असलेल्या नागरिकाचे मृत्यू ओढवणे. खोकला होऊन गंभीर आजारास निमंत्रण देणे असे अनेक प्रकारचे दुष्परिणामाचे लक्षण निर्माण होत आहे. काहीवेळा धूळउड्डू नये करीता पाण्याचा फवारा मारला जातो. मात्र चिकट माती असल्याने त्यावरून अनेक मोटर सायकली घसरून पडून जखमी झालेले आहेत. प्रत्येक दुकानात दररोज एक किलो माती निघत आहेत. जी दुकाने आणि जनता पांढरे शुभ्र न्याहाळून निघत आहेत. याची लाज कोणत्याच लोकप्रतिनिधी अथवा प्रशासनास वाटत नाही ही शोकांतिका आहे. यासाठी सर्व नागरिकांनी १ डिसेंबरला सहभाग घ्यावा असे आवाहन डॉ मोहम्मद आरीफखान पठाण आणि साजिदराज सहित सर्व जयहिंद ऑटो सेनेतर्फे करण्यात येत आहे.

दुष्काळात पाण्याची नासाडी! आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

नळयोजनेतून लाखो लिटर पाणी रस्त्यावर; ग्रामविकास अधिकाऱ्यांना वारंवार सांगूनही दखल नाही : भाजप शहराध्यक्ष गजानन बोंढारे पाटील यांचा संताप

कळमनुरी । गंगासागर पंडित

हिंगोली-नांदेड रोडवरील आखाडा बाळापूर ग्रामपंचायत हद्दीत नळयोजनेचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहून जात असल्याने ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. एकीकडे दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, तर दुसरीकडे ग्रामपंचायतीच्या नळयोजनेतून लाखो लिटर पाणी अक्षरशः रस्त्यावर वाया जात असल्याचे चित्र दिसत आहे. रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात चिखलाचे



साम्राज्य निर्माण झाले असून नागरिक, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पाणी साचल्याने दुर्गंधी तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या समस्येबाबत ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे यांना वारंवार माहिती देऊनही अद्याप ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याचा आरोप भाजप शहराध्यक्ष गजानन बोंढारे पाटील यांनी केला आहे. दुष्काळाच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची गरज असताना ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे लाखो लिटर पाणी वाया जाणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जनतेला पिण्यासाठी पाणी मिळत नाही आणि दुसरीकडे नळयोजनेचे पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. ग्रामपंचायतीने तातडीने गळती बंद करून पाण्याची नासाडी थांबवावी, अशी मागणी गजानन बोंढारे पाटील यांनी केली आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन नळयोजनेची पाहणी करावी, गळती दुरुस्त करावी आणि नागरिकांना होणारा त्रास थांबवावा, अशी मागणी नागरिकांमधूनही होत आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याची अशी उघडपणे होणारी नासाडी थांबविण्यात ग्रामपंचायत प्रशासन कधी जागे होणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नवा मोंढा परिसरात व्यापाऱ्यावर जीवघेणा हल्ला; कारने धडक देऊन जखमी केल्याची घटना सीसीटीव्हीत कैद

नांदेड । प्रतिनिधी

शहरातील नवा मोंढा परिसरात जुन्या आर्थिक वादातून एका व्यापाऱ्याला कारने धडक देऊन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात व्यापारी कपिल पोकर्णा हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डाव्या पायाला दुखापत झाली आहे. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नांदेडमधील व्यापारी कपिल पोकर्णा आणि हरी राजेगोरे यांच्यात जुना आर्थिक वाद सुरू होता. याच वादातून हरी राजेगोरे आणि त्याच्या इतर साथीदारांनी संगनमत करून कपिल पोकर्णा यांना कारने जोरदार धडक दिली. हा केवळ अपघात नसून जिवे मारण्याच्या उद्देशाने केलेला पूर्वनियोजित हल्ला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. धडकेनंतर पोकर्णा यांच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेचे गांभीर्य दर्शवणारे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले आहे.



या प्रकरणातील मुख्य आरोपी हरी राजेगोरे याच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांमध्ये यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, गरिबांच्या हक्काचे रेशन धान्य काळ्या बाजारात विकणाऱ्या 'रेशन माफिया' टोळीशी त्याचे संबंध असल्याची जोरदार चर्चा स्थानिक पातळीवर आणि व्यापारी वर्तुळात सुरू आहे. सराईत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीकडून व्यापाऱ्यावर अशा प्रकारे भरदिवसा हल्ला झाल्याने नवा मोंढा परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

या घटनेनंतर कपिल पोकर्णा यांच्या तक्रारीवरून नांदेडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी हरी राजेगोरे व त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध जिवे मारण्याचा प्रयत्न करणे व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

महागाव रेशन काळाबाजाराशी धागेदोरे

आरोपी हरी राजेगोरे याच्यावर विविध पोलीस ठाण्यांत यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. गरिबांच्या हक्काचे रेशन धान्य काळ्या बाजारात विकणाऱ्या रेशन माफियाशी त्याचे संबंध असल्याची चर्चा असतानाच, काही दिवसांपूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील महागाव पोलिसांनी रेशनचे तांदूळ जप्त करत कारवाई केली होती. या गुन्ह्यात आरोपींच्या यादीत हरी राजेगोरे याचेही नाव असल्याचे समोर आले आहे.

गौळ बाजार शिवारात अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील गौळ बाजार शिवारात अवैधरीत्या रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने पकडून कळमनुरी पोलीस ठाण्यात जमा केले. महसूल विभागाच्या या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

दि.१९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास गौळ बाजार परिसरातील कॅनॉलच्या पुलाजवळ एक सोनालिका कंपनीचे ट्रॅक्टर



अवैधरीत्या रेती वाहतूक करताना आढळून आले. सदर ट्रॅक्टरमध्ये रेतीसह ट्रॉली असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. यावेळी महसूल विभागाच्या पथकाने ट्रॅक्टर थांबवून चालकाकडे रेती वाहतुकीचा परवाना व इतर कागदपत्रांची चौकशी केली. मात्र, आवश्यक परवाना नसल्याचे निदर्शनास आल्याने ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला.

त्यानंतर सदर ट्रॅक्टर कळमनुरी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला. कारवाईदरम्यान ट्रॅक्टरमध्ये अंदाजे १ ब्रास रेती असल्याचे नमूद करण्यात आले असून, रेती व वाहनाची अंदाजे किंमत लाखो रुपयांच्या घरात असल्याचे तक्रार अर्जात नमूद आहे. उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते व तहसीलदार जीवा कुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

कारवाईमध्ये मंडळ अधिकारी आनंद काकडे, प्रेम चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी प्रतीक पालखडे, विजय भंडारे, विकास पंडित, महेश गळाकाटू, कमलकुमार यादव व एकनाथ कदम यांचा समावेश होता. महसूल विभागाकडून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर कारवाई सुरू असून, अशा प्रकारे विनापरवाना रेती वाहतूक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

लोहा तहसील कार्यालयात फेरफारच्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक लूट? कोणत्याही कामासाठी ३०० ते ४०० रुपयांची मागणी केली जाते!

लोहा । अशोक सोनकांबळे

लोहा तहसील कार्यालयात फेरफार नोंदीच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून २०० ते ३०० रुपयांची मागणी केली जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे. शासनाने निश्चित केलेले शुल्क अवघे ४० रुपये असताना संबंधित कामासाठी ३०० रुपयांची मागणी होत असेल, तर सर्वसामान्य शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. एका जागरूक नागरिकालाच ४० रुपयांच्या फेरफार कामासाठी ३०० रुपयांची मागणी होत असेल, तर



दररोज तहसील कार्यालयात येणाऱ्या अशिक्षित, गरीब आणि साध्या भोळ्या शेतकऱ्यांकडून किती पैसे उकळले जात असतील, याचा अंदाज बांधणेही कठीण आहे.

शेतकऱ्यांना आपल्या जमिनीच्या कामासाठी तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. त्यातच अशा प्रकारे पैशांची मागणी होत असल्यास हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणाची जिल्हाधिकारी नांदेड यांनी गांभीर्याने दखल घेऊन लोहा तहसील कार्यालयातील फेरफार प्रक्रियेची चौकशी करावी. शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जादा पैशांची मागणी करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या कामासाठी अतिरिक्त पैशांची मागणी कशासाठी? प्रशासन याची चौकशी करणार का, हा खरा प्रश्न आहे!

जांभळी गावातील मजुरांचे तेलंगणात स्थलांतर; स्थानिक रोजगाराच्या मुद्द्यावरून ग्रामस्थांमध्ये चर्चा

नांदेड । प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांनी दत्तक घेतलेल्या तालुक्यातील जांभळी गावातून शेकडो ग्रामस्थ रोजगाराच्या शोधात शेजारील तेलंगणा राज्यात स्थलांतर करत असल्याची बाब समोर आली आहे. स्थानिक पातळीवर हाताला काम उपलब्ध नसल्यामुळे अनेक कुटुंबे आपल्या मुलांचे शिक्षण अर्धवट सोडून आणि संपूर्ण संसारोपयोगी साहित्य घेऊन कामासाठी तेलंगणाला जात असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

गावातील काही रहिवाशांच्या आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, जांभळी हे गाव दत्तक घेतल्यानंतर तिथे मोठ्या प्रमाणावर विकासकामे होतील आणि स्थानिकांना रोजगार मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती. मात्र, तालुक्यात किंवा गावात बारमाही रोजगार उपलब्ध करून देणारी कोणतीही ठोस योजना अद्याप कार्यान्वित झाली नसल्याची तक्रार या नागरिकांनी केली आहे. पोटापाण्याचा प्रश्न सुटत नसल्याने नाईलाजास्तव मुलांच्या शाळा बुडवून परराज्यात जावे लागत असल्याची व्यथा स्थलांतरित होणाऱ्या मजुरांनी बोलून दाखवली आहे. यामुळे गावातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर परिणाम होत असल्याची चिंताही व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे, या संदर्भात खासदार अशोकराव चव्हाण यांच्या कार्यालयाकडून किंवा स्थानिक प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.. हंगामी स्थलांतर हा ग्रामीण भागातील जुना प्रश्न असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गरज आहे. सध्या जांभळी गावातील या स्थलांतराच्या मुद्द्यावरून तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, प्रशासनाने याकडे लक्ष देऊन स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या वाढदिवसानिमित्त धनाजी जोशी यांच्यावतीने उपजिल्हा रुग्णालयात खिचडी वाटप

देगलूर । अजीम अन्सारी

राज्यसभेचे खासदार तथा ज्येष्ठ नेते डॉ. अजित गोपछडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांच्या वतीने देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना खिचडीचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला. सध्या परिसरात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून वाढदिवसाच्या पारंपरिक स्वरूपाला फाटा देत अन्नदानाच्या माध्यमातून हा वाढदिवस साजरा करण्यात आला. देगलूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेले अनेक रुग्ण तसेच त्यांच्यासोबत दिवसरात्र थांबणारे नातेवाईक यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. रुग्णांची सेवा करताना त्यांच्या नातेवाईकांचीही अनेकदा जेवणाची गैरसोय होते. ही बाब लक्षात घेऊन धनाजी जोशी यांनी रुग्णालयात खिचडी वाटपाचा उपक्रम आयोजित केला. यावेळी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना आपुलकीने खिचडीचे वाटप करण्यात आले.



वाढदिवस म्हणजे केवळ हारतुरे, केक आणि शुभेच्छांचा कार्यक्रम नसून समाजातील गरजू आणि अडचणीत असलेल्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याची संधी आहे, हा सामाजिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविणे आणि सामाजिक कार्यातून लोकसेवेचा वसा जपणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या आगळ्यावेगळ्या सामाजिक उपक्रमाचे रुग्णालय परिसरातील नागरिक, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च करण्यापेक्षा गरजूंच्या भुकेची जाणीव ठेवून अन्नदान करणे हा खऱ्या अर्थाने समाजोपयोगी आणि इतरांनीही आदर्श घ्यावा असा उपक्रम असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. वाढदिवसाच्या आनंदाला सामाजिक सेवेची जोड देत धनाजी जोशी यांनी समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

जलजीवन मिशन योजनेच्या अर्पुण कामामुळे ग्रामस्त पाण्या वाचुन वंचीत

उपविभागीय अधिकारी यांनी तज्ञा अधिकारी यांच्या मार्फत पाहणी कराण्याची गावकऱ्यांची विनंती

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी शहरा पासुन जवळच आसनाऱ्या देवनांद्रा ग्रामपंचायत येथील जलजीवन मिशन योजनेच्या कामासाठी लाखो रुपये खर्च करुन ही आज पर्यंत जलजीवन मिशन योजनेचे काम अपुर्ण राहील्या मुळे ग्रामस्त पाण्यावाचुन वंचित राहत आहेत याची उपविभागीय अधिकारी यांनी दखल घेवुन संबधीत तज्ञ अधिकारी यांच्या मार्फत सदरील योजनेच्या कामाची गुणवता,प्रगती व अमलबजावणी यांची प्रतेक्ष पाहणी करावी व अपुर्ण काम पुर्ण करुन तातडीणे पाणी पुर्वठा कराण्यासाठी उपाय योजना करावी आसी मागणी सागर कॉलणी देवनांद्रा येथील अमोल रणशुर व ग्रामस्तांच्या वतीने उपविभागीय अधिकारी पाथरी यांच्या कडे एका निवेदनाद्वारे केली आहे. सविस्तर वृत्त आसे कि पाथरी तालुक्यातील



देवनांद्रा येथे शासनाच्या वतीने जलजीवण मिशन योजना मंजुर करण्यात आली आहे देवनांद्रा येथील या योजने साठी शासानाच्या वतीने आज पर्यंत लाखो रुपये खर्च करुन ही काम अपुर्णच राहीले आहे.

या मुळे उन्हाळा व दुष्काळजन्य परिस्थीतीत सागर कॉलणी, नरेद्र नगर देवनांद्रा व देवनांद्रा गाव-ातील नागरीकांना पिण्यासाठी पाण्याच्या समस्यांना समोर जावे लागत आहे शासनाच्या महत्वकांक्षी योजने वर लाखो रुपये निधी खर्च करुण ही नागरीकांना पाणी मिळत नसेल तर योजनेतील कामाची गुवंता,प्रगती व अमलबजावणी याची तज्ञा मार्फत प्रतेक्ष चौकसी करुन संबधीतास काम पुर्ण करण्यासाठी आदेशीत करावे व योजना पुर्ण होई पर्यंत नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी पीण्याच्या पाणीची व्यावस्ता करावी आस्या मागणीचे निवेदन सागर कॉलणी,नरेद्र नगर सहीत देवनांद्रा येथील ग्रामस्तांच्या वतीने अमोल रणशुर यांनी दि.१७/११/२०२६ रोजी उपविभागीय अधिकारी पाथरी यांना दिले आहे सदरील निवेदनावर अमोल रणशुर सहीत सागर कॉलणी,नरेद्र नगर व देवनांद्रा येथील आनेक ग्रामस्तांच्या स्वक्षरी आहेत. आता उपविभागीय अधिकारी सदरील निवेदनाची दखल घेवुन कोनती कार्यवाही करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पिंप्री बु. येथे जलतारा व पोखरा योजनेवर शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील पिंप्री बु. येथे शेतकऱ्यांना शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलतारा आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा) या योजनांची सविस्तर माहिती देण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मा. उत्तमराव माने यांच्या अध्यक्षतेखाली पिंप्री बु. ग्रामपंचायत कार्यालयासमोर दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ९:०० वाजता संपन्न झालेल्या या कार्यक्रमास गावातील (पान २ वर)

जगात कुठेच रक्त तैयार होत नाही म्हणून रक्तदान करणे आवश्यक-खुर्शीदआलम



बीड/प्रतिनिधी

भारत देशाचे पहिले मिसाईल मॅन स्वतंत्र सेनानी ह.टेपो सुलतान रहे. यांचा वाढदिवस म्हणून साजरा केला जातोय याच निमित्ताने आज बीड शहरातील बालेपीर भागात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे अल्पसंख्यांक शहराध्यक्ष शेख वसीम भाई ग्रूपच्या वतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, या शिबिरात १३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे, सदर शिबिराला आ.संदिप भैय्या क्षीरसागर, मा.आ.सलीम भाई, भाजपा अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख इर्शाद भाई, पोलिस निरीक्षक श्री.भल्लाळ साहेब यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेटी देऊन वसीम भाई यांना शुभेच्छा दिल्या आहेत, यावेळी बीड नगरपरिषदेचे गटनेते तथा रा.काँ.शप.पार्टी पक्षाचे बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी स्वतःचे रक्तदान करून आपले मनोगत व्यक्त करताना (पान २ वर)

आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त टोकवाडी येथे २२ नोव्हेंबरला 'माय महोत्सव'

महाआरोग्य शिबिरासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन-डॉ.भरत मुंडे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील टोकवाडी येथे आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य 'माय महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त महाआरोग्य शिबिर, मोफत औषधोपचार, कर्तृत्ववान महिलांचा सन्मान, देवघर माझं सुंदर गं स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धा अशा विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सौ. राजश्रीताई धनंजयराजी मुंडे व मा. सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी (नगराध्यक्ष, नगर परिषद परळी वैजनाथ) यांच्या हस्ते होणार आहे.

हा कार्यक्रम श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड येथे होणार आहे. आईच्या अमृतदिनाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा स्तुत्य उपक्रम आयोजकांनी हाती घेतला आहे.



महाआरोग्य शिबिर व मोफत औषधोपचार

महोत्सवातील सकाळच्या सत्रात भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रमुख उपस्थितीतील डॉक्टरांची नावे :

डॉ. आर. बी. जाजू (एम.डी. मेडिसिन), डॉ. राजाराम मुंडे (एम.डी. मेडिसिन), डॉ. शालिनी कराड (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. बालासाहेब कराड (एम.डी. मेडिसिन), डॉ. अजित केंद्रे (बालरोग तज्ज्ञ), डॉ. शैलेन्द्र गरकल (एम.डी. मेडिसिन), डॉ. मधुसूदन काळे (अस्थिरोग तज्ज्ञ), डॉ. माऊली घुगे (एम.डी.मेडिसिन), डॉ. सचिन गिते (अध्यक्ष, पी.एम.ए.), डॉ. सूर्यकांत मुंडे (बालरोग तज्ज्ञ), डॉ. सतीश गुटे (एम.डी. मेडिसिन) आणि डॉ. शिरीष आघाव (सचिव, पी.एम.ए.).

महाआरोग्य शिबिरातील तपासण्या :

- दंत तपासणी : डॉ.मनोज मुंडे, (पान २ वर)

सौ.शैला शरदराव जोशी यांचे दु:खद निधन



बीड/प्रतिनिधी

येथील क्रांती नगर येथील रहिवासी श्री. शरद बापूराव जोशी यांच्या पत्नी सौ. शैला शरदराव जोशी यांचे दि. १९.११.२०२६ रोजी रात्री ९ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अचानक निधन झाले.

दि. १९.११.२०२६ रोजी रात्री ९ च्या सुमारास त्यांना अचानक धाप लागण्याचा त्रास होऊ लागला व घाम फुटला. त्यांचे पती व नातेवाईकांनी त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला, मात्र रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सौ. शैला जोशी या शिक्षण व प्रशिक्षण महाविद्यालय, नांदेड येथून अधीक्षक (श्रेणी-२) या पदावरून सन २०१३ मध्ये सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांचे पती श्री. शरदराव जोशी हे देखील एसटी महामंडळातून सन २०१३ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार विवाहित मुली, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे चिरंजीव श्री. विश्वंभर जोशी हे उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत, तर त्यांच्या चारही मुली व जावई उच्च पदांवर कार्यरत असून पुणे येथे स्थायिक आहेत. अतिशय मनमिळाऊ व धार्मिक स्वभावाच्या सौ. शैला जोशी यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

उसाला ४२००/- रुपये भावासाठी पाडळशिंगी टोल नाक्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जोरदार आंदोलन संपन्न-गायके राजू

प्रशासनाकडून २७ नोव्हेंबरला बैठकीचे लेखी आश्वासन

बीड/प्रतिनिधी

मराठवाड्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी साहेब यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रीय महामार्गावरील पाडळसिंगी टोलनाका येथे चक्काजाम आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री रवींद्र इंगळे, बीड जिल्हाध्यक्ष श्री गायके राजू, दिनकर रिंगणे, शेख खिजर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

शासनाचे प्रतिनिधी श्री सुपेकर सु. शं., प्रादेशिक सहसंचालक, साखर संकुल, छत्रपती संभाजीनगर, गेवराईचे तहसीलदार तसेच गेवराई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व ग्राम महसूल अधिकारी श्री जगदीश सोळशे यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेनंतर लेखी आश्वासन देण्यात आले. दि. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी साखर कारखानदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी साहेब यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे आश्वासन मिळाल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार श्री राजू शेट्टी साहेब व मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री रवींद्र इंगळे यांच्या आदेशाने आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मात्र, २७ नोव्हेंबरपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास पाडळसिंगी टोलनाक्यावर पुन्हा तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात येईल. याची प्रशासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी, असा इशारा जिल्हाध्यक्ष श्री गायके राजू यांनी दिला. (पान २ वर)

बौद्धविहाराच्या मंजूर आराखड्याला समाजबांधवांचा विरोध; कामाला स्थगिती देऊन फेरबदल करण्याची मागणी!

पालम नगरपंचायतीकडे सामूहिक निवेदन; मंजूर वर्कऑर्डर रद्द करण्याचीही मागणी

पालम/अनिस खुरेशी

शहरातील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्धविहाराच्या बांधकामावरून आता वाद निर्माण झाला आहे. सदर बौद्धविहारासाठी तयार करण्यात आलेला मंजूर फ्लोअर प्लान हा समाजाच्या धार्मिक, सामाजिक भावना आणि भविष्यातील गरजा लक्षात न घेता तयार करण्यात आल्याचा आरोप समाजबांधवांनी केला आहे. त्यामुळे सदर आराखड्याला तात्काळ स्थगिती देऊन त्याचे करावे तसेच यापूर्वी देण्यात आलेला रद्द करावा, अशी मागणी सामूहिक निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



बौद्धविहार हे केवळ प्रार्थनेचे ठिकाण नसून भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांचा प्रसार आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वांचे प्रतीक असलेले सामाजिक, शैक्षणिक आणि प्रबोधनाचे केंद्र आहे. (पान २ वर)

कौसडीत शहीद हजरत टिपू सुलतान यांची जयंती साजरी



जिंतूर/प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथे शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता स्वतंत्रता वीर, शूरवीर शहीद हजरत टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या जयंती कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य लिंबाजीराव इखे, माजी चेअरमन तातेराव बारवकर, माजी उपसरपंच चंद्रकांत कुलकर्णी, पंचायत समिती सदस्य मुजाहेद कादरी, हाफिजोद्दीन खतीब, शेर खा पठाण, शेख इमरान, साजिद पठाण, पोलीस पाटील संभाजी इखे, समीर पठाण, शेख जाकीर (पान २ वर)

दारु, सिगारेट, तंबाखूचे 'व्यसन' वाईट सवय नव्हे तर गंभीर मानसिकक आजार!-डॉ.जगदीश टेकाळे

सुरुवातीची मजा अन् फॅशन हळूहळू नेते व्यसनांच्या गर्तेत, व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणणे हेच सर्वोत्तम

बीड/प्रतिनिधी

दारू, सिगारेट, तंबाखू किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या नशेकडे असेल तर या केवळ एक वाईट सवय म्हणून पाहिले जाते. इच्छाशक्ती सवयी कधीही सोडून देता येते, असा सर्वसामान्य समज आहे. मात्र, वैद्यकीय आणि मानसोपचार शास्त्रानुसार ही कोणतीही साधी सवय नसून थेट मेंदूवर परिणाम करणारा एक गंभीर मानसिक आजार आहे. या नशेखोरीच्या गर्तेत हळूहळू अडकणाऱ्या व्यक्तींचे आयुष्य, कुटुंब उद्ध्वस्त होते. वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेतला तर प्रभावी उपचाराने वाईट सवयी म्हणजे मानसिक आजारांवर मात करता येते. त्याहून चांगले म्हणजे व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणा, असा लाखमोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

प्रश्न : दारू, सिगारेट किंवा तंबाखूच्या सेवनाला वाईट सवय म्हटले जाते. हे मानसिक आजार कसे ?



आपण ज्याला सवय समजतो, तो प्रत्यक्षात मेंदूचा एक आजार आहे. सुरुवातीला व्यक्ती जस्ट इंजॉय म्हणून स्वतःच्या मर्जीने व्यसन सुरू करते. हळूहळू केव्हाही ती सवय बनते हे त्यालाही समजत नाही. एकदा मेंदू त्या नशेवर अवलंबून राहिला की, व्यक्तीची इच्छाशक्ती कमकुवत होतें. त्यातूनच भांडण, तंटे, संशयवृत्ती, मारहाण, चोरी अशा गुन्हेगारीकडे वळतो. त्यामुळे हे केवळ चारित्र्याचे किंवा सवयीचा भाग नसून वैद्यकीय उपचारांची गरज असलेला मानसिक आजार आहे.ॅ

प्रश्न : सवयीचे रूपांतर व्यसनाधीनतेत कसे होते ?

सुरुवातीला तरुण तणावमुक्तीसाठी, मित्रांच्या दबावापोटी किंवा मौजमजेसाठी याचे सेवन करतात, पण निकोटिन, अल्कोहोल किंवा इतर अमली पदार्थ मेंदूतील डोपामाइन नावाचे आनंदाचे रसायन रिलीज करतात, जेव्हा नशा उतरते, तेव्हा मेंदूला पुन्हा तीच पातळी हवी असते. यामुळे शरीरावर आणि मनावर ताबा मिळतो. हळूहळू प्रमाण वाढते (पान २ वर)



कडा येथे हजरत टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. टिपू सुलतान हे इंग्रजांविरुद्ध लढणारे पहिले शूरवीर होते. गुलामीपेक्षा वाघासारखे एक दिवस जगणे श्रेष्ठ, असा त्यांचा संदेश आजही तरुणांना प्रेरणा देतो,असे यावेळी उपस्थितांनी सांगितले.या कार्यक्रमाला कडा येथील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व युवक उपस्थित होते.

त्रिपुरारी पौर्णिमा व गुरुनानक जयंतीनिमित्त कंकालेश्वर मंदिरात भव्य दीपोत्सव आणि महाआरतीचे आयोजन

हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळणार शिवनगरी बीड; समस्त बीडकरांना सहकुटुंब सहभागी होण्याचे आवाहन


बीड/प्रतिनिधी

बीड शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक वैभवात भर घालणारा भव्य दीपोत्सव सोहळा यंदा त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक जयंती आणि देव दिवाळीच्या मंगलमय पर्वानिमित्त श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून या भव्य दीपोत्सव आणि महाआरतीला सुरुवात होणार आहे. हजारो दिव्यांच्या प्रकाशाने कंकालेश्वर मंदिर परिसर उजळून निघणार असून, या सोहळ्याच्या माध्यमातून शिवनगरी बीडमध्ये भक्ती, श्रद्धा आणि एकजुटीचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

मचला बीडकरांनो... एकत्र येऊया, हजारो दिव्यांनी शिवनगरी कंकालेश्वर उजळवूया!फ या संकल्पनेतून समस्त शिवप्रेमी आणि शिवभक्त बीडकरांच्या वतीने या महादीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्तिक महिन्याची त्रिपुरारी पौर्णिमा, कार्तिक पर्वाची सांगता, गुरुनानक जयंती आणि देव दिवाळी या पवित्र पर्वांचे औचित्य साधून हा भक्तिमय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आपल्या बीड नगरीला ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभला असून, श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिर हे बीडकरांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र आहे. याच पवित्र स्थानी हजारो दिवे प्रज्वलित करून सामूहिक भक्तीचा नवा अध्याय लिहिण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

हा केवळ दिव्यांचा उत्सव नसून आपल्या



श्रद्धेचा, संस्कृतीचा, धार्मिक परंपरेचा आणि बीडकरांच्या एकजुटीचा उत्सव आहे. प्रत्येक बीडकराने किमान एक दिवा प्रज्वलित करून या महादीपोत्सवात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या सोहळ्यामध्ये माता-भगिनी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान बालगोपाळांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासह सहभागी व्हावे. घरा-पुरती मर्यादित न राहता देव दिवाळीचा हा आनंद आपल्या आराध्य दैवताच्या चरणी भक्तीचा दीप प्रज्वलित करून साजरा करावा, असे भावनिक आवाहन करण्यात आले आहे.

एक दिवा भक्तीचा... एक दिवा श्रद्धेचा... एक दिवा संस्कृतीचा... आणि एक दिवा आपल्या बीडच्या वैभवाचा! (पान २ वर)



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगभित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

कार्तिकी यात्रा २०२६ साठी पुणे महानगरपालिकेकडून आळंदी नगरपरिषदेस आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

आळंदी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रा सन २०२६ च्या अनुषंगाने लाखो वारकरी व भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे महानगरपालिका, आळंदी नगरपरिषद तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर समितीचे विश्वस्त यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण बैठक यशस्वीरित्या संपन्न झाली. सदर बैठकीस पुणे महानगरपालिकेच्या महापौर मा. सौ. मंजुषा नागापुरे, भारतीय जनता पक्षाचे पुणे शहराध्यक्ष धीरजभाऊ घाटे, नगरसेवक अमर आवळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

तसेच आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांतदादा कुर्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्ष सौ. सुजाताताई तापकीर, भावार्थ देखणे (प्रमुख विश्वस्त, श्री क्षेत्र आळंदी देवस्थान), योगी निरंजननाथ महाराज (विश्वस्त, श्री क्षेत्र आळंदी देवस्थान), चैतन्य महाराज लोंढे (विश्वस्त, श्री क्षेत्र आळंदी देवस्थान) तसेच संजय घुंडरे पाटील, यात्रा समिती सभापती सौ. पूजा गुंडरे, नगरसेवक सोमनाथ कुराडे, गोविंद कुराडे, रामचंद्र भोजले उपस्थित होते. कार्तिकी यात्रेसाठी राज्याच्या विविध भागांतून अंदाजे १५ ते २० लाख वारकरी व भाविक आळंदी येथे येत असतात. या पार्श्वभूमीवर यात्रेचे नियोजन अधिक सक्षम करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत खालील सुविधांची मागणी करण्यात आली.

बैठकीमध्ये अखंडित पाणीपुरवठा, अग्निसुरक्षा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि यांत्रिक स्वच्छता व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून वरील सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक सहकार्य करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पुणे महानगरपालिका, आळंदी नगरपरिषद व श्री क्षेत्र आळंदी देवस्थान यांच्या समन्वयातून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

माधव खांडेकर, मुख्याधिकारी
आळंदी नगरपरिषद, आळंदी-देवाची

वाय.सी.एम. औषधसाठ्याबाबत प्रसारित वृत्ताच्या अनुषंगाने महापालिकेचे स्पष्टीकरण

एफडीएचा छापा नसून महापालिकेने एफडीएला तपासणीकरिता पाठविण्यात आलेला व एफडीएने गुणवत्तेच्या मानांकन नुसार औषधे नसलेला असा अहवाल

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वाय.सी.एम.) येथील औषध भांडारातील औषधांच्या गुणवत्तेबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आली आहे. औषधांच्या गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त होताच महापालिकेने अन्न व औषध प्रशासन (ऋऊ) यांच्याकडे तपासणीसाठी पाठपुरावा केला. ऋऊ च्या अहवालानुसार संबंधित औषधे गुणवत्तेच्या मानकांनुसार नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर उत्पादक कंपनी व पुरवठादाराविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली आहे.

महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयाकडून दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी Cap. B-Complex with Zinc (CareZinc) या औषधांच्या गुणवत्तेबाबत गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मोशी यांना पत्राद्वारे सदर औषधांचा साठा तपासणीसाठी ताब्यात घेऊन त्याच्या वापरयोग्यतेबाबत अहवाल देण्याची विनंती केली. तत्पूर्वी महापालिकेने सदर औषधांचा साठा वापरास प्रतिबंधित करून बाजूला ठेवलेला होता. त्यानुसार ऋऊ च्या अधिकाऱ्यांनी त्याच दिवशी संबंधित औषधांचा नमुना तपासणीसाठी ताब्यात घेतला. सदर औषधांचा पुरवठा मे. श्रीविनायक फार्मा, पुणे यांच्यामार्फत Inducare Pharmaceuticals and Research Foundation, Jejuri MIDC, Pune या उत्पादक कंपनीकडून करण्यात आला होता.

त्यानंतर ऋऊ कडून दि. १६ जुलै २०२६ रोजी प्राप्त अहवालामध्ये Cap. B-Complex with Zinc हे औषध "Not of Standard Quality' (गुणवत्तेच्या निर्धारित मानकांनुसार नसलेले) असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या अहवालाच्या अनुषंगाने महापालिकेने दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी संबंधित उत्पादक कंपनी Inducare Pharmaceuticals and Research Foundation यांना तीन वर्षांच्या कालावधीसाठी काळ्या यादीत समाविष्ट केले. तसेच औषधांचा पुरवठा करणाऱ्या मे. श्रीविनायक फार्मा, पुणे यांना तीन वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिबंधित करण्यात आले.

यानंतर ऋऊ कार्यालयाकडून दि. २७ जुलै २०२६ रोजी संबंधित कंपनी मे. श्रीविनायक फार्मा यांनी पुरवठा केलेल्या १२ प्रकारच्या औषधांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ११ प्रकारची औषधे "Not of Standard Quality' असल्याचे, तर २ औषधे निर्धारित गुणवत्ता मानकांनुसार असल्याचे महापालिकेस कळविण्यात आले. त्यानुसार ऋऊ कार्यालयाकडून दि.४ नोव्हेंबर २०२६ रोजी संबंधित ११ प्रकारच्या औषधांचा संपूर्ण साठा तपासणी व पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेण्यात आला.

सदर ११ प्रकारच्या औषधांच्या साठ्याची एकूण किंमत ११ लाख ९५ हजार ८६३ रुपये (११,९५,८६३) इतकी आहे. तथापि, काही वृत्तांमध्ये १ कोटी ७२ लाख ७५ हजार १२६ (१,७२,७५,१२६) किमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही रक्कम आणि ऋऊ कडून ताब्यात घेण्यात आलेल्या ११ प्रकारच्या औषधांच्या प्रत्यक्ष साठ्याची किंमत यामध्ये तफावत असून, संबंधित ११ औषधांच्या साठ्याची किंमत ११,९५,८६३ इतकी असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. यासाठी कोणतीही रक्कम महापालिकेतर्फे पुरवठादार कंपनीस अदा करण्यात आलेली नाही.

औषधांच्या गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने ऋऊ कडे तपासणीसाठी पाठपुरावा केला असून, प्राप्त अहवालाच्या आधारे संबंधित उत्पादक व पुरवठादाराविरुद्ध तीन वर्षांसाठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. नागरिकांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीने महापालिका औषधांच्या गुणवत्ता नियंत्रणाबाबत आवश्यक ती दक्षता घेत असून, औषधांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास त्याची नियमानुसार तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

वाय.सी.एम. रुग्णालयातील औषधांच्या साठ्याबाबत अन्न व औषध प्रशासन (ऋऊ) यांच्याकडून कोणतीही छापेमारी (ठरळव) करण्यात आलेली नाही. औषधांच्या गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने स्वतःहून पुढाकार घेत संबंधित औषधांचा साठा तपासणीसाठी ऋऊ कडे पाठविला होता. औषधांच्या गुणवत्तेची खात्री करणे आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे या उद्देशाने महापालिकेने ही कार्यवाही केली. त्यामुळे ऋऊ कडून छापेमारी करून औषधसाठा जप्त केल्याचे वृत्त वस्तुस्थितीला धरून नाही.

– डॉ. लक्ष्मण गोफणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

औषधांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने तातडीने संबंधित औषधांचा साठा तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्याची कार्यवाही केली. ऋऊ कडून वाय.सी.एम. रुग्णालयात कोणतीही छापेमारी करण्यात आलेली नसून, औषधांची गुणवत्ता पडताळणी करण्यासाठी महापालिकेने स्वतःहून पुढाकार घेतला होता. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित उत्पादक कंपनी व पुरवठादाराविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात आली आहे. नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरू नये, यासाठी या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर आणणे आवश्यक आहे.

– कुलदीप जंगम अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मटण दुकानांमध्ये मटणाचे प्रदर्शन न करताच विक्री व्हावी; यावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी : अभिषेक बारणे

आठ दिवसांत अहवाल सादर करून स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्याचे निर्देश

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील सर्व मटण दुकानांमध्ये मटणाचे उघड्यावर प्रदर्शन न करता, समोरून योग्य आच्छादन किंवा पडदे लावून आतल्या पद्धतीनेच मटणाची विक्री व्हावी, अशी स्पष्ट व ठाम भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडली. या संदर्भातील सविस्तर अहवाल पुढील आठ दिवसांत सादर करून तो स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी आणला जाईल, तसेच प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. महापालिका सर्वसाधारण सभेत शहरातील नागरी प्रश्न, स्वच्छता आणि प्रशासकीय कामकाजावर बोलताना बारणे यांनी विविध मुद्द्यांकडे सभागृहाचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधले. शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांलगतच्या मटण दुकानांसमोर उघड्यावर होणाऱ्या प्रदर्शनामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि स्वच्छतेचा प्रश्न लक्षात घेता, सर्व दुकानांवर समोरून आच्छादन लावून आतल्या आत व्यवहार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या विषयावर पुढील आठ दिवसांत प्रशासनाकडून अहवाल मागवून तो स्थायी समितीपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवला जाईल. त्यामुळे संबंधित विभागाने कोणताही विलंब न लावता तत्काळ कार्यवाही सुरू करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

केवळ मटण दुकानांचाच विषय नव्हे, तर संपूर्ण शहराची स्वच्छता, सुंदरता आणि राहण्यायोग्य वातावरण टिकवून ठेवण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी या दोन चाकांनी समन्वयाने चालणे आवश्यक असल्याचे बारणे यांनी अधोरेखित केले. गेल्या दहा-पंधरा दिवसांत पाच-सहा प्रभागांतील क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या भेटींचा संदर्भ देत त्यांनी प्रशासकीय पातळीवरील समन्वयाच्या अभावावर बोट ठेवले. प्रत्येक प्रभागात एक उपअभियंता आणि त्यांच्याअंतर्गत तीन कनिष्ठ अभियंते कार्यरत असताना, त्यांनी संबंधित नगरसेवकांसोबत दर आठवड्याला एकत्र बसून रुग्णालय, प्रशासकीय इमारती, उद्याने, क्रीडांगणे, रस्ते आणि पदपथांच्या देखभाल-दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, अशी सूचना त्यांनी केली.

अर्थसंकल्प पुस्तिकेत देखभाल-दुरुस्तीच्या आसपासची सुमारे सातशे कामे समाविष्ट असताना, त्यापैकी केवळ साडेतीनशे ते चारशे कामेच आता प्रसिद्ध झाल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणली. देखभाल-दुरुस्ती आणि वसुलीची कामे नियमितपणे होणे आवश्यक असून, साप्ताहिक बैठकीत दिलेल्या सूचना खालच्या स्तरापर्यंत योग्य प्रकारे पाळल्या जातात की नाही, याची खात्री प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी सुचवले. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित शहर देण्यासाठी मटण विक्रीच्या नियमांपासून ते प्रभाग स्तरावरील मूलभूत सुविधांपर्यंत प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

शहरातील स्वच्छता, सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सोयीसाठी सर्व मटण दुकानांमध्ये उघड्यावर प्रदर्शन न करता, समोरून आच्छादन लावून आतल्या पद्धतीनेच विक्री व्हायला हवी, अशी आमची ठाम भूमिका आहे. याबाबत पुढील आठ दिवसांत याचा अहवाल स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर केला जाईल. प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी, तसेच प्रभाग स्तरावरील देखभाल-दुरुस्ती, मूलभूत सुविधा आणि मोशी कचरा व पाणीपुरवठ्याच्या नियोजनाबाबतही स्पष्ट व जबाबदारीने पावले उचलावीत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या दोन चाकांनी समन्वयाने काम केल्यास शहराचा कारभार अधिक गतिमान आणि नागरिकाभिमुख होईल.

– अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती

पाण्याचा अपव्यय करणाऱ्या ५ नागरिकांचे नळजोड खंडित; प्रत्येकी २,००० दंडात्मक शुल्क आकारणार; आळंदी नगरपरिषदेची कठोर कारवाई

आळंदी । प्रतिनिधी

आळंदी नगरपरिषद हद्दीतील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने व काटकसरीने करणे आवश्यक आहे. पाणी ही अत्यंत मौल्यवान नैसर्गिक संपत्ती असून, उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे ही सर्व नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाकडून वेळोवेळी नागरिकांना आवाहन करूनही काही नागरिकांकडून पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर तसेच मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या बाबीची गंभीर दखल घेत आळंदी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत दिनांक २०/११/२०२६ रोजी विशेष तपासणी व कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान पाण्याचा अपव्यय करताना आढळून आलेल्या एकूण ५ नागरिकांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत. तसेच संबंधित नागरिकांकडून प्रत्येकी रुपये २,०००/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात येणार आहे.



नगरपरिषद प्रशासनामार्फत पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी यापुढेही नियमित तपासणी करण्यात येणार असून, पाण्याचा अनावश्यक वापर करणाऱ्या नागरिकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर आवश्यकतेनुसारच करावा, नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये तसेच पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

माधव खांडेकर
मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी

महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ कलावंत सुहास जोशी यांचा मानपत्र देऊन गौरव

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीत मराठी रंगभूमी, लोककला आणि सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ कलावंत, अभिनेते व दिग्दर्शक सुहास दामोदर जोशी यांना आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ सुहास जोशी यांनी मराठी रंगभूमी, लोकनाट्य, एकांकिका, निवेदन आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ५० हून अधिक नाटके आणि ४० हून अधिक एकांकिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत. ग्रामीण संस्कृतीचा अस्सल गंध, बोलीभाषेतील सहजता आणि व्यक्तिरेखांमधील वास्तवता ही त्यांच्या अभिनयाची वैशिष्ट्ये आहेत. कामगार कल्याण नाट्यस्पर्धा, राज्य नाट्यस्पर्धा आणि विविध सांस्कृतिक महोत्सवांमधील त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना ५० हून अधिक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. लोककला संमेलने, अभिजात मराठी सप्ताह तसेच कथाकथनाच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि लोकसंस्कृतीच्या संवर्धनासाठीही त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. गेल्या दहा वर्षांपासून राज्य नाट्यस्पर्धांचे परीक्षक म्हणून काम करत नवोदित कलाकारांना मार्गदर्शन करण्याचे कार्यही ते करत आहेत.

त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा गौरव करणे ही पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाची बाब आहे,त्यांच्या पुढील कला वाटचालीसाठी महापौर रवि लांडगे यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व संस्कृती समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजित बारणे, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत को-हाळे, नगरसदस्या मनिषा चिंचवडे तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम उपस्थित होते. मानपत्राचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

मेट्रोच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करा; उपमहापौर शर्मिला बाबर यांची मागणी

टिळक चौक ते मोरवाडी दरम्यानच्या रस्त्यांची दुरवस्था; मेट्रोचे मुख्य कार्यकारी संचालक अतुल गाडगीळ यांना निवेदन

पिंपरी । प्रतिनिधी

निगडी ते मोरवाडी मेट्रो मार्गावरील टिळक चौक ते मोरवाडी दरम्यान रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना सहन करावा लागणारा त्रास लक्षात घेता उपमहापौर शर्मिला बाबर यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पुणे येथील कार्यालयात भेट देऊन मुख्य कार्यकारी संचालक अतुल गाडगीळ यांची भेट घेतली आणि त्यांना निवेदन सादर केले.

मेट्रोच्या कामामुळे या मार्गावरील रस्त्यांची अवस्था खराब झाली असून, ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालक, पादचारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असून अपघातांचा धोकाही वाढला आहे. विशेषतः दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या समस्येचे तातडीने निराकरण होणे आवश्यक आहे.



या पार्श्वभूमीवर उपमहापौर बाबर यांनी संबंधित रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक दुरुस्ती आणि डांबरीकरणाचे काम प्राधान्याने पूर्ण करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. तसेच मेट्रोचे काम सुरू असलेल्या ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित राहील, यासाठी योग्य सुरक्षा उपाययोजना व आवश्यक वाहतूक व्यवस्थापन करण्याची सूचनाही केली.

मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे नागरिकांना दररोज गैरसोयीचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजविणे आणि डांबरीकरणाची कामे विनाविलंब पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित व सुरळीत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा उपमहापौर शर्मिला बाबर यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवडमध्ये १० जानेवारीला पहिली आंतरराष्ट्रीय ग्रँण्ड मॅरेथॉन; २२ परदेशी धावपटूंचा सहभाग

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पहिल्यांदाच पीसीएमसी ग्रँण्ड मॅरेथॉन ही आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा १० जानेवारीला आयोजित केली आहे. त्यात २० ते २२ आंतरराष्ट्रीय धावपटू सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा यापुढे दरवर्षी आयोजित केली जाणार आहे. स्पर्धेचे टी शर्ट आणि शुभंकर बिबट्याचे अनावरण महापौर रवी लांडगे व आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १९) करण्यात आले.

महापालिकेतील मुधकरराव पवळे सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेला उपमाहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, क्रीडा समिती सभापती कैलास कुटे, नगरसेवक धर्मराज तंतरपाळे, योगेश लांडगे, शाम जगताप, तानाजी बारणे, उपायुक्त पंकज पाटील, अण्णा बोदडे आदी उपस्थित होते. ही स्पर्धा दरवर्षी १० जानेवारीला आयोजित केली जाणार आहे. स्पर्धा ४२ किमी अंतर, पूर्ण मॅरेथॉन २१ किमी अंतर, अर्ध मॅरेथॉन १० किमी आणि ५ किमी धावणे असे चार वेगवेगळ्या गटांत होणार आहे. रावेत येथील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय येथून स्पर्धा सुरू होऊन तेथेच संपेल. पुणे ग्रँण्ड टूर आंतरराष्ट्रीय सायकल शर्यतीचा मार्ग तसेच, बीआरटीएस मार्गावरून ही शर्यत जाणार आहे. महापौर लांडगे व आयुक्त सूर्यवंशी यांच्या हस्ते स्पर्धेचे टी शर्ट व शुभंकर बिबट्याचे अनावरण करण्यात आले.

आयुक्त सूर्यवंशी म्हणाले, की या स्पर्धेसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी १० जानेवारी ही तारीख राखीव असणार आहे. पुणे सायकल ग्रँण्ट टूर शर्यतीसाठी केलेल्या सुशोभित मार्गावरून मॅरेथॉन जाणार आहे. स्पर्धेत २० ते २२ आंतरराष्ट्रीय धावपटू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेनंतर मुंबईची आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन होणार असल्याने या स्पर्धेत चाचणी म्हणून अनेक नामवंत धावपटू सहभागी होण्याची शक्यता आहे. स्पर्धाला वर्ल्ड थलॅटिक्सची मान्यता आहे, असा दावा आयुक्तांनी केला आहे.

मॅरेथॉनला दुष्काळाशी जोडणे हास्यास्पद

महापालिकेने आयोजित केलेल्या नाट्य कार्यक्रमांसाठी २५ लाखांचा खर्च, तर मॅरेथॉनला ५० लाखांचा खर्च अपेक्षित आहे. मॅरेथॉनचा खर्च पुरस्कर्त्यांचा देणगीतून केला जाणार आहे. त्या खर्चाला राज्यातील दुष्काळ स्थिती व महापालिकेच्या विविध कामांसाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाशी जोडणे हास्यास्पद आहे. दुष्काळाच्या कारणामुळे ही स्पर्धा न घेतल्यास दहा जानेवारी ही तारीख पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी रद्द केली जाईल. ती आपल्याला पुन्हा मिळणार आहे, असा दावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी केला आहे.

साजगाव यात्रेत भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

पाळणे, स्टॉल, परवाने आणि आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता हवी; दुर्घटनेनंतर जागे होण्यापेक्षा प्रशासनाने आधीच जबाबदारी निश्चित करावी

खोपोली । साबीर शेख

खालापूर तालुक्यातील साजगाव येथील प्रसिद्ध बोंबल्या विठोबा ताकई देवस्थान यात्रेचा उत्सव सुरू होत असताना यंदाच्या यात्रेतील नियोजन, परवानगी प्रक्रिया, सुरक्षाव्यवस्था आणि आर्थिक व्यवहारांबाबत विविध प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. हजारो भाविक श्रद्धेने आणि उत्साहाने यात्रेत सहभागी होत असताना त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न आता नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. गेली अनेक वर्षे नगरपरिषद प्रशासनाच्या माध्यमातून यात्रेच्या कालावधीत स्वच्छता, आरोग्य, मूलभूत सुविधा, वाहतूक नियोजन आणि सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येत होत्या. अधिकारी व कर्मचारी यांच्या देखरेखीखाली यात्रेचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केले जात असल्याने भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होत होत्या. मात्र, यंदा यात्रेच्या व्यवस्थापनात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर परवानगी, देखरेख आणि सुरक्षेच्या जबाबदाऱ्यांबाबत संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

यात्रेतील प्रमुख आकर्षण असलेल्या मोठ्या पाळण्यांची उभारणी, मनोरंजनाची साधने, खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि विविध व्यावसायिकांना दिल्या जाणाऱ्या जागांबाबत आवश्यक नियम व निकषांचे पालन झाले आहे का, याची स्पष्ट माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. पाळण्यांची तांत्रिक तपासणी, सक्षम प्राधिकरणाचे सुरक्षा प्रमाणपत्र, विद्युत यंत्रणेची तपासणी, प्रशिक्षित कर्मचारी, आपत्कालीन बचाव व्यवस्था आणि वैद्यकीय सुविधा यांची खातरजमा कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात आली, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

खोपोलीतील पूर्वीच्या दुर्घटनेचा विसर पडला का?

खोपोली परिसरात यापूर्वी पाळण्याच्या दुर्घटनेत एका पर्यटकाला गंभीर दुखापत होऊन पाय गमवावा लागल्याची घटना घडली होती. या दुर्घटनेने मनोरंजनाच्या साधनांच्या सुरक्षेचा प्रश्न अधोरेखित केला होता. अशा घटनांमधून धडा घेऊन भविष्यात कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. साजगाव यात्रेतही सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड होऊ नये, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

परवानगी देणारे कोण, जबाबदारी स्वीकारणारे कोण?

यात्रेच्या आयोजनात देवस्थान संस्थान,



धर्मादाय यंत्रणा, वन विभाग, स्थानिक प्रशासन आणि संबंधित परवानगी देणाऱ्या यंत्रणांची भूमिका महत्त्वाची आहे. पाळणे व अन्य मनोरंजनाच्या साधनांना परवानगी देताना कोणते निकष लावण्यात आले? महसूल संकलन आणि परवानगी प्रक्रियेत पारदर्शकता आहे का? सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई कोण करणार? दुर्घटना घडल्यास नुकसानभरपाईची जबाबदारी कोण स्वीकारणार? या प्रश्नांची उत्तरे संबंधित यंत्रणांनी अधिकृतपणे जाहीर करणे गरजेचे आहे.

पारंपरिक व्यावसायिकांवर अन्याय झाल्याची चर्चा

यंदाच्या यात्रेतील लिलाव प्रक्रिया आणि व्यावसायिकांना जागा वाटपाबाबतही काही पारंपरिक व्यावसायिकांमध्ये असमाधान असल्याची चर्चा आहे. अनेक वर्षांपासून यात्रेत व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना डावलून आर्थिक लाभ अधिक मिळवून देणाऱ्या व्यावसायिकांना प्राधान्य दिले जात असल्याची नाराजी काही घटकांकडून व्यक्त होत असल्याचे समजते. या आरोपांची सत्यता संबंधित यंत्रणांनी स्पष्ट करावी. यात्रेच्या परंपरेशी जोडलेल्या स्थानिक व्यावसायिकांना न्याय मिळावा आणि लिलाव व जागा वाटप प्रक्रिया पारदर्शक असावी, अशी मागणी पुढे येत आहे.

भाविकांच्या श्रद्धेचा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा सन्मान राखा!

साजगाव यात्रा ही धार्मिक श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. यात्रेच्या उत्साहाला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी संस्थान, प्रशासन, वन विभाग आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. यात्रेच्या संपूर्ण कालावधीत नियमित तपासणी, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, अग्निसुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवणे ही केवळ औपचारिकता न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे.

यात्रेतील पखवानग्या, सुरक्षा निकष, लिलाव प्रक्रिया, महसूल संकलन आणि जबाबदारी निश्चिती याबाबत अधिकृत माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे. यात्रेच्या आयोजनात आर्थिक हितसंबंधांपेक्षा भाविकांची सुरक्षा, पारंपरिक व्यावसायिकांचे हित आणि सार्वजनिक व्यवस्थेची जबाबदारी यांना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. यात्रेचा आनंद भाविकांनी घ्यावा; मात्र त्यांच्या जीविताची सुरक्षितता 'रामभरोसे' राहू नये. दुर्घटना घडल्यानंतर चौकशी आणि कारवाई करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये, यासाठी प्रशासनाने वेळीच ठोस पावले उचलावीत. साजगाव यात्रेच्या व्यवस्थापनाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे संबंधित यंत्रणा देणार का, याकडे आता खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे.

dharashiv:Layout 1 11/20/2026 10:46 PM Page 1

महाराष्ट्रातील दैनिक

जगमित्र

● परभणी ● शनिवार , दि २१ नोव्हेंबर २०२६ ● पान क्र.०४

पीएम स्वनिधी कर्जवाटप उद्दिष्टपूर्तीत परभणी महापालिका राज्यात प्रथम
केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव



परभणी । प्रतिनिधी पथविक्रेत्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पीएम स्वनिधी योजनेंतर्गत कर्जवाटपाचे निर्धारित उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करत परभणी शहर महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. १ ते १० लाख लोकसंख्या गटात मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल केंद्रीय शहरी कार्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते परभणी महानगरपालिकेला सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. या पुरस्कारामुळे परभणी महानगरपालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.पीएम स्वनिधी योजनेच्या माध्यमातून शहरातील पथविक्रेत्यांना व्यवसायवृद्धीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेंतर्गत पात्र पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देणे, त्यांना योजनेची माहिती देणे तसेच कर्जवाटपाचे निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने प्रभावीपणे प्रयत्न केले. या कामाची दखल घेत राज्यस्तरावर परभणी महानगरपालिकेला प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला.या पुरस्काराचा स्वीकार परभणीचे महापौर सय्यद इक्बाल सय्यद खाजा, उपमहापौर गणेश देशमुख आणि महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केला. यावेळी उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे, इफतेयार खान पठाण आणि महम्मद शेख उपस्थित होते.पीएम स्वनिधी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून,.पथविक्रेत्यांनं आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीनेही योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे.परभणी महानगरपालिकेसाठी हा पुरस्कार अभिमानास्पद असून, भविष्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या यशातून प्रेरणा मिळणार आहे.या यशाबद्दल स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल सरोदे, गटनेते दिलीप ठाकूर, विजय सिंह जामकर, गुलमिर खान, विश्वजीत बुधवंत, सागर गंगाळे यांच्यासह सर्व सभापती, गटनेते व नगरसेवकांनी महापौर, उपमहापौर, आयुक्त आणि महानगरपालिका प्रशासनाचे अभिनंदन केले.

जिंतूरमध्ये डीजे चोरी करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात दुचाकीसह ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

परभणी स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



परभणी । प्रतिनिधी जिंतूर शहरात झालेल्या डीजे चोरीच्या गुन्ह्याचा परभणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छडा लावला आहे. या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेला डीजेचा मुद्देमाल आणि एक दुचाकी असा एकूण ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५८१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) प्रमाणे डीजे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परभणी जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंकज परमेश्वर इंगळे वय २२ आणि निखिल ऊर्फ भावड्या गोपीनाथ रोडे वय २५, दोघेही रा. सावंगी माळसा, ता. जिंतूर यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांनी डीजे चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर चोरीस गेलेला डीजेचा मुद्देमाल आणि गुन्ह्यातील एक दुचाकी असा एकूण ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ताब्यात घेतलेल्या दोन्ही संशयितांना जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी जिंतूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक चिखले आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश सवंडकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, पोलीस हवालदार मुकेश बुधवंत, पांडुरंग तुपसुंदर, सुनील राठोड, नेताजी गीते, उत्तम हनवते आणि पोलीस शिपाई उमेश चव्हाण

पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह यांचे प्रतिपादन; विद्यार्थ्यांना दूरदृष्टी आणि दृढनिश्चयाने राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन



परभणी । प्रतिनिधी हवामान बदलामुळे भारतीय शेतीसमोर अनेक आव्हाने निर्माण होत आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, उत्पादन खर्चात कपात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. शून्य मशागत, अचूक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि उपग्रह आधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून शाश्वत शेती विकसित करण्यावर भर देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह यांनी केले.वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठा दि.२० नोव्हेंबर रोजी दीक्षांत समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने मागील साडेचार वर्षांत केलेल्या शैक्षणिक, संशोधन आणि विस्तार कार्याचे त्यांनी कौतुक केले. या कामगिरीमुळे विद्यापीठाची राष्ट्रीय स्तरावरील ओळख अधिक उंचावल्याचे त्यांनी नमूद केले.भारतीय कृषी क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून, सकल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा सुमारे १८.२ टक्के वाटा आहे. देशातील ४५.६ टक्के लोकसंख्येचा उदरनिर्वाह कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १.६४ अब्ज होण्याची शक्यता असल्याने अन्नधान्याची मागणी वाढणार आहे. त्यामुळे उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करून उत्पादनक्षमता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.शून्य मशागत, लेझर लँड लेव्हलिंग, भाताची थेट पेरणी, जैविक खतांचा वापर, सेंद्रिय व नैसर्गिक शेती यांसारख्या तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्च आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करता येऊ शकते. तसेच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, जीपीएस, रिमोट सेन्सिंग, जीआयएस, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतीविषयक निर्णय अधिक अचूकपणे घेता येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.विद्यार्थ्यांनी केवळ इच्छा व्यक्त न करता ध्येयपूर्तीसाठी कठोर परिश्रम आणि कृती करावी. आपले कार्य पुढील पन्नास वर्षे स्मरणात राहील, असे योगदान द्यावे. जी-वनात करुणा, सद्भावना आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासत गुरु-शिष्य नात्याचे पावित्र्य जपावे, असे आवाहन त्यांनी स्नातकांना केले.दरम्यान, विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी प्रगती अहवाल सादर केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, देशातील २० राज्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांच्या नऊ देशांतील शैक्षणिक भेटींची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वीणा भालेराव आणि डॉ. रणजित

पार्वती टॉवरमध्ये सुंदरकांडाचा भक्तिरस; श्रीराम-हनुमंताच्या जयघोषाने परिसर दुमदुमला!

ॲड. सुरेश गडदे यांच्या पुढाकारातून भजनाचे आयोजन



हिंगोली/गोपाल सातपुते हिंगोली - शहरातील पार्वती टॉवर येथे मंगळवारी रात्री आयोजित सुंदरकांड भजन सोहळ्याला नागरिक आणि भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रीरामाच्या भक्तीने भारलेले वातावरण, सुरेल भजनांची मैफल आणि हनुमंताच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ॲड. सुरेश गडदे यांच्या पुढाकारातून या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी श्री हनुमंत रायाच्या आणि प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर रात्री आठ वाजता सुंदरकांड भजनाला प्रारंभ झाला. हिंगोली येथील सुंदरकांड भजनी मंडळाने संगीताच्या सुरेल साथीने सुंदरकांडाचे गायन सादर केले. भक्तिमय स्वर, तालबद्ध संगीत आणि रामनामाच्या गजरामुळे उप-स्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्याला हिंगोली शहरासह शिरसम, खेर्डा आणि परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. भजना दरम्यान अनेक भाविकांनी टाळ्यांच्या गजरात आणि जय श्रीरामच्या घो-षणांनी भक्तिभाव व्यक्त केला. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात भक्ती, संस्कार, सकारात्मकता आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत होण्यास मदत होते, याचा प्रत्यय या सोहळ्यातून आला. रात्री उशिरापर्यंत भक्तिमय वातावरण कायम होते.

पालम महसूल विभागाची मध्यरात्री धडक कारवाई!

अवैध रेती वाहतूक करणारे ३ हायवा पकडले; राव्राजूर येथे महसूल पथकाची कारवाई



पालम/अनिस खुरेशी

पालम तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली असून, मौजे राव्राजूर येथे मध्यरात्री करण्यात आलेल्या कारवाईत अवैध रेती वाहतूक करणारे तब्बल तीन हायवा वाहने पकडून ताब्यात घेण्यात आली आहेत.दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११:४० वाजण्याच्या सुमारास उपविभागीय अधिकारी, गगाखेड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार, पालम यांच्या नियोजनानुसार महसूल विभागाच्या गौण खनिज वाहतूक प्रतिबंधक पथकाने ही कारवाई केली.या धडक कारवाईत तीन हायवा वाहने पकडण्यात आली असून, जप्त केलेली वाहने तहसील कार्यालय, पालम येथे आणून लावण्यात आली आहेत.या कारवाईत ग्राममहसूल अधिकारी सदानंद लटपटे, अमोल गर्जे, आदित्य सुडे, प्रशांत ढोणे, महसूल सेवक शिवशंकर तिरवड, इफात पठाण, वाहनचालक तसेच पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.अवैध रेती उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाने केलेल्या या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. शासनाच्या महसुलाचे संरक्षण करण्यासाठी अशा बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे. आता या कारवाईनंतर अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाची मोहीम कितपत प्रभावी ठरते, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

धावपट्टूंचा वेग, गोळाफेकीचा जोर अन् कबड्डीचा थरार; परभणीत क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद



मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुल, परभणी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील युवकांच्या क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सुप्त क्रीडा कौशल्य विकसित व्हावे तसेच शारीरिक तंदुरुस्ती, खिलाडूवृत्ती आणि सांघिक भावना वाढीस लागावी, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत १०० मीटर धावणे (मुले व मुली), गोळाफेक (मुले व मुली) आणि कबड्डी (मुले व मुली) अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. सर्व क्रीडा प्रकारांमध्ये युवक व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले क्रीडा कौशल्य प्रदर्शित केले.१०० मीटर धावण्याच्या मुलींच्या स्पर्धेत अनुजा अवचार यांनी प्रथम, पूजा इंगळे यांनी द्वितीय, तर मीरा काळदाते यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत आदित्य राऊत यांनी प्रथम, अथर्व गिते यांनी द्वितीय, तर स्वप्निल काकडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.गोळाफेक मुलींच्या स्पर्धेत पूजा इंगळे यांनी प्रथम, प्रिती तांदळे यांनी द्वितीय, तर अस्मिता थोरवट यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गोळाफेक मुलांच्या स्पर्धेत स्वप्निल काकडे यांनी प्रथम, आदित्य राऊत यांनी द्वितीय, तर वैभव कदम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या कबड्डी स्पर्धेत रन अकॅडमी संघाने प्रथम, तर एकलव्य अकॅडमी संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. मुलींच्या कबड्डी स्पर्धेतही रन अकॅडमी संघाने प्रथम, तर एकलव्य अकॅडमी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.या कार्यक्रमास जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर, क्रीडा अधिकारी सुभाष नाटकर, क्रीडा मार्गदर्शक संजय मुंडे व प्रकाश पंडित तसेच सहायक कक्ष अधिकारी गजानन गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेसाठी पंच म्हणून यमनाजी भाळशंकर, कैलास टेहरे, गोविंद काजळे, निलेश यादव, गजानन भालेराव, शेख कलीम, आदिनाथ सोळंके, योगेश भाळशंकर, अजय राठोड, सतीश कदम, बालाजी सलगर, वैभव तरंगे, अर्जुन भाळशंकर व अब्दुल खदिर यांनी काम पाहिले. विविध क्रीडा प्रकारांत सहभागी झालेल्या खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले. युवकांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

प्रभाग ५ मधील कचराकुंडी बंद परिसरातील स्वच्छता राखण्याची जबाबदारी आता नागरिकांची!

परभणी मनपाच्या पुढाकारातून शिवशक्ती परिसर स्वच्छ



परभणी । सुधाकर श्रीखंडे शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी केवळ महानगरपालिका प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाचीही आहे. प्रशासनाने स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला असला, तरी नागरिकांच्या सहभागाशिवाय स्वच्छतेचे उद्दिष्ट साध्य होणे शक्य नाही. याच सामाजिक जाणिवेतून परभणी शहर महानगरपालिकेने प्रभाग क्रमांक ५ मधील शिवशक्ती परिसरात मंत्री मंगल कार्यालयाजवळील मोठी कचराकुंडी बंद करून परिसराचे सुशोभीकरण केले. शुक्रवारी (दि. २० नोव्हेंबर) राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून स्वच्छतेचा संदेश देत नागरिकांना आपल्या परिसराप्रती जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली.स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. शिवशक्ती परिसरात निर्माण झालेली मोठी कचराकुंडी बंद करून त्या जागेची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर आकर्षक रांगोळी काढून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले. त्यामुळे कचऱ्याचा ढीग साचणाऱ्या जागेचे रूपांतर स्वच्छ आणि सुंदर परिसरात करण्याचा प्रयत्न करण्यात आला.महापौर सय्यद इकबाल आणि महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या संकल्पनेतून, उपमहापौर गणेश देशमुख, स्थायी समिती सभापती प्रतिभा अतुल (तात्या) सरोदे, सदस्य मीनाताई वरपूडकर, आजेगावकर, गणेश उर्फ बबलू टाक, रितेश झांबड, उपायुक्त तुकाराम कदम आणि विभागप्रमुख मिर्झा तन्वीर बेग यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.स्वच्छता निरीक्षक प्रल्हाद देशमाने आणि त्यांच्या सफाई कर्मचाऱ्यांनी कचराकुंडी बंद करून परिसर स्वच्छ केला. यावेळी शहर समन्वयक तुराब खान, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुरा, मुकादम पुरभाजी उबाळे, जय मकरंद, मिलिंद उबाळे, तुषार उबाळे तसेच महिला कर्मचारी उप-स्थित होत्या.

स्वच्छता केवळ मनपाची नव्हे, प्रत्येकाची जबाबदारी! सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, कचराकुंडीच्या परिसरात अस्वच्छता निर्माण करणे आणि स्वच्छतेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे यामुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होतो. त्यामुळे नागरिकांनी घरातील कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतच द्यावा. रस्ते, चौक आणि मोकळ्या जागांवर कचरा टाकू नये. कचराकुंडी बंद केल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी कचरा साचणार नाही, याची जबाबदारी परिसरातील नागरिकांनीही स्वीकारावी.'माझा परिसर, माझी जबाबदारी' ही भावना प्रत्येक नागरिकाने अंगीकारली, तरच स्वच्छतेची मोहीम लोकचळवळ बनेल. प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांची साथ मिळाल्यास परभणी शहर स्वच्छ आणि सुंदर करण्याचे उद्दिष्ट निश्चितच साध्य होऊ शकते, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक क्रांतीचा वारसा :

एका महात्म्याने पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज अंतराळापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत, प्रयोगशाळेपासून न्यायालयापर्यंत आणि शाळेपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रकाश पसरवत आहे त्यांच्या कार्याविषयी थोडक्यात आढावा



भारतीय समाजाच्या इतिहासात महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी घडवून आणलेली शैक्षणिक क्रांती ही केवळ शिक्षणाची सुरुवात नव्हती, तर हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेला दिलेले मोठे आव्हान होते. स्त्रीशिक्षण, बहुजनांचे शिक्षण आणि वंचित घटकांना ज्ञानाची दारे खुली करण्याचा धाडसी विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला. सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू करून त्यांनी भारतीय समाजात एका नव्या परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. या ज्ञानक्रांतीच्या वाटचालीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी भारताच्या पहिल्या महिला शिक्षिकेच्या रूपाने ऐतिहासिक यो-गदान दिले.एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य आणि सामाजिक विषमतेच्या विळख्यात अडकलेला होता. शिक्षण हा समाजातील काही विशिष्ट वर्गांचाच अधिकार मानला जात होता. स्त्रिया, शूद्र, अतिशूद्र आणि वंचित समाजघटकांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही, ही जाणीव त्यांनी समाजात रुजवली.महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू करून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा नवा अध्याय सुरू केला. पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन त्यांनी शिक्षिका म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहित केले. शाळेत जाताना सावित्रीबाईंना तत्कालीन समाजव्यवस्थेचा तीव्र विरोध सहन करावा लागला. त्यांच्यावर शेण, चिखल आणि दगड फेकले जात होते. मात्र, या विरोधाला न जुमानता त्यांनी शिक्षणकार्य सुरू ठेवले. महात्मा फुले यांनीही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून ही चळवळ पुढे नेली.महात्मा फुले यांनी मुलींच्या शिक्षणाबरोबरच शूद्र, अतिशूद्र आणि वंचित समाजातील मुलांसाठीही शिक्षणाची दारे खुली केली. १८५१ मध्ये पुण्यातील रास्ता पेठ आणि वेताळ पेठ परिसरातही मुलींच्या शाळा सुरू केल्या. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई फुले यांच्यासह फातिमा शेख यांचेही मोलाचे योगदान होते. तत्कालीन समाजव्यवस्थेचा विरोध सहन करून या सर्वांनी शिक्षणाचा प्रसार केला. त्यांच्या शैक्षणिक कार्याची तत्कालीन ब्रिटिश प्रशासनानेही १८५२ मध्ये दखल घेतली.महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार केवळ साक्षरतेपुरते मर्यादित नव्हते. स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, आत्मसन्मान आणि निर्णयक्षमता प्राप्त व्हावी, हा त्यामागील व्यापक दृष्टिकोन होता. बालविवाह, विधवांचे हाल, केशवपन आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. विधवांना आधार देणे आणि अनाथ बालकांचे संरक्षण करणे यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होईल आणि पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाचे संस्कार रुजतील, असा त्यांचा ठाम विश्वास होता.१८७३ मध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीय विषमता, धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा आणि सामाजिक शोषणाला विरोध करून समता, बंधुता आणि विवेकनिष्ठ विचारांचा प्रसार करणे हा या संस्थेचा उद्देश होता. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन असल्याची त्यांची भूमिका होती.महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगासमोर आपले शैक्षणिक विचार मांडले. प्राथमिक शिक्षण सर्वसामान्यांसाठी सक्तीचे आणि मोफत असावे, ग्रामीण भागातील मुलांपर्यंत शिक्षण पोहोचावे आणि बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी त्यांनी आग्रही भूमिका घेतली. शिक्षणावरील खर्च उच्चवर्गीयांच्या शिक्षणापुरता मर्यादित न राहता सामान्य जनतेच्या प्राथमिक शिक्षणासाठी व्हावा, असे त्यांचे मत होते. शिक्षण हे सामाजिक न्यायाचे प्रभावी माध्यम बनले पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' या विचारातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून अज्ञान, अन्याय, शोषण आणि गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले.शैक्षणिक क्रांतीचा आधुनिक भारतातील विस्तार आज महात्मा फुले यांनी पेटविलेल्या शिक्षणाच्या ज्योतीचा प्रकाश देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. एकेकाळी शिक्षणापासून वंचित असलेले समाजघटक आज विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. अंतराळ संशोधनात झेप घेणारे वैज्ञानिक, खगोलशास्त्रज्ञ, उपग्रह आणि अवकाश तंत्रज्ञान विकसित करणारे संशोधक, देशाच्या सीमांचे रक्षण करणारे संरक्षण दलातील अधिकारी, आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करणारे अभियंते अशा असंख्य व्यक्ती ज्ञानाच्या बळावर देशाच्या प्रगतीत योगदान देत आहेत.वैद्यकीय क्षेत्रात रुग्णांचे प्राण वाचविणारे डॉक्टर, संशोधनातून नव्या उपचारपद्धती विकसित करणारे शास्त्रज्ञ, समाजाला दिशा देणारे पत्रकार, न्यायासाठी लढणारे वकील, न्यायदान करणारे न्यायाधीश, कायदा व सुव्यवस्था सांभाळणारे पोलीस अधीक्षक, प्रशासनाची धुरा सांभाळणारे जिल्हाधिकारी आणि विविध क्षेत्रांत नेतृत्व करणारे अधिकारी आज देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या सर्व क्षेत्रांतील प्रगतीचा पाया ज्ञान, शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समान संधी हाच आहे.

आजच्या काळातील महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व आज इंटरनेट, डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षणव्यवस्थेमुळे ज्ञानाची दारे अधिक व्यापक झाली आहेत. अंतराळ संशोधनापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत आणि आधुनिक विज्ञानापासून संरक्षण तंत्रज्ञानापर्यंत भारताने मोठी झेप घेतली आहे. मात्र, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करणे, मुलींचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे ही आव्हाने आजही कायम आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीपासून डिजिटल शिक्षणाच्या विस्तारापर्यंत प्रत्येक उपक्रमात सर्वसमावेशकता आणि समान संधी या मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आजही या प्रक्रियेला दिशादर्शक ठरतात. त्यांनी मांडलेली समता, स्वातंत्र्य, विवेक आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आत्मसात केली, तर शिक्षणाच्या माध्यमातून देशाला अधिक प्रगत आणि समताधिष्ठित बनविता येईल. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून भारतीय समाजाला नवी दिशा दिली. मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करणे, वंचित समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करणे, प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध व्हावे यासाठी आग्रही भूमिका घेणे आणि शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनविणे, हे त्यांचे कार्य भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविले गेले आहे. त्यांनी पेटविलेली शिक्षणाची ज्योत सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आणि पुढील अनेक समाजसुधारकांच्या कार्यातून अधिक तेजस्वी झाली. महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य हे केवळ एका कालखंडातील सामाजिक सुधारणा नव्हते, तर आधुनिक भारताच्या समताधिष्ठित आणि लोकशाहीवादी समाजनिर्मितीचा भक्कम पाया होता. शिक्षणापासून वंचित असलेल्या प्रत्येक घटकाला ज्ञानाच्या प्रवाहात आणणे आणि शिक्षणातून सामाजिक समता प्रस्थापित करणे, हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.

भिडे वाड्यातील एका छोट्याशा शाळेतून सुरू झालेली ज्ञानक्रांती आज अंतराळाच्या अमर्याद अवकाशापर्यंत पोहोचली आहे. या ऐतिहासिक परिवर्तनाच्या मुळाशी आहे महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजाला दिलेली शिक्षणाची अमूल्य देणगी!

प्रभाकर बारहाते,
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय,परभणी

कळमेश्वर शहरात ३५ वर्षीय युवकाचा राहत्या घरी आकस्मिक मृत्यू; परिसरात हळहळ!



दिनांक २० ११ २०१६कळमेश्वर शहरातील नगरपरिषद लेआउट, वार्ड क्रमांक ४ येथे राहणारे विजय साहेबराव वरठे (वय ३५ वर्षे) यांचा स्वतःच्या राहत्या घरी आकस्मिक मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.पोलीस तपास सुरूया घटनेचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोजजी काळबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या तपासात अरुण नगरगोंजे, पोलीस कर्मचारी दुर्गेश डहाके आणि पोलीस कर्मचारी राम नेहारे हे कार्यरत आहेत.मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलीस तपासानंतरच अधिक माहिती समोर येणार आहे. मृतदेह देव्यांशी फाउंडेशन सामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे यांच्या ॲम्बुलन्सनी ग्रामीण रुग्णालय कळमेश्वर येथील दाखल. भावपूर्ण श्रद्धांजली!

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रका